भतवाल हॉस्पिटल म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर, मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२६८ ■ बुधवार १ जुलै २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

Post Regd.No./DHL/53/24-26


बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

### अभ्यंकर महाविकास आघाडीचे उमेदवार

## उपसभापतीपदासाठी अर्ज देत सचिन अहिर यांचा उध्दव ठाकरेंच्या शिवसेनाला अखेर जय महाराष्ट्र



**मुंबई, दि. ३० : विधान परिषदेच्या उपसभापतीपदाच्या निवडणुकीच्या तोंडावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाला आणखी मोठा धक्का दिला आहे. ठाकरे गटाचे वरळीतील खंदे शिलेदार आणि विधान परिषदेचे आमदार सचिन अहिर यांनी शिवसेना शिंदे गटातून उपसभापतीपदाच्या निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. सचिन अहिर हे शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचे बोलले जात आहे. या धक्कादायक राजकीय घडामोडीमुळे शिवसेना ठाकरे गटाचे विधान परिषदेतील संख्याबळ आणखी घटले आहे. आता ठाकरे गटाकडे केवळ पाच आमदार उरले आहेत. अनिल परब, मिलिंद नार्वेकर, अंबादास दानवे, ज. मो. अभ्यंकर आणि सुनील शिंदे यांचा त्यात समावेश आहे. दरम्यान, महाविकास आघाडीकडे केवळ पंधरा संख्याबळ आहे. तरीही लोकशाही टिकविण्यासाठी निवडणूक लढणे महत्वाचे आहे. त्यासाठी महाविकास आघाडीने मुंबई शिक्षक मतदारसंघाचे आमदार आणि शिक्षण क्षेत्रातील ज्येष्ठ अभ्यासक जगन्नाथ मोतीराम अभ्यंकर यांची उमेदवारी दाखल केली आहे. मतदान उद्या (दि. १) दुपारी बाराला होणार आहे.**

**निवडणुकीच्या दिवशीच धक्कातंत्र**

सभापती राम शिंदे यांनी काल (२९ जून) सभागृहात उपसभापतीपदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार, एक जुलै २०२६ रोजी दुपारी बाराला वाजता ही निवडणूक होणार आहे. मात्र, त्यापूर्वीच एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा धक्कातंत्राचा वापर केला. शिवसेना शिंदे गटाकडून चक्क ठाकरे गटाचे आमदार सचिन अहिर यांनी उपसभापतीपदासाठी अर्ज दाखल केला. सचिन अहिर अर्ज भरत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह माजी उपसभापती नीलम गोऱ्हे आणि मंत्री चंद्रकांत पाटील देखील उपस्थित होते.

**वरळी मतदारसंघात ठाकरेंना फटका**

सचिन अहिर यांचे शिवसेना शिंदे गटात जाण्याने (पान ४ वर)

### रघुवंशी, पेशन्स ठेवा... आणि गेम बदलला!

नंदुरबार, दि.३० (रणजित राजपूत)- विधान परिषदेच्या उपसभापतीपदासाठी शिवसेनेचे आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू असतानाच अखेरच्या क्षणी राजकीय घडामोडींनी अनपेक्षित वळण घेतले. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे आमदार सचिन अहिर यांनी शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर उपसभापतीपदाचे समीकरण पूर्णपणे बदलले आणि रघुवंशी यांच्या संधीवर विरजण पडले. (पान ४ वर)

### टीईटी पेपर फुट प्रकरणी बिजेंद्र गुप्ता मास्टरमाईंड

मुंबई/पाटना, दि. ३० : महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा पेपर लीक प्रकरणाचे धागेदोरे थेट बिहारपर्यंत पोहोचले आहेत. बिहार मधील समस्तीपूरचा रहिवासी असलेला बिजेंद्रकुमार गुप्ता हा या पेपर लीक प्रकरणाचा मुख्य सूत्रधार असल्याची माहिती समोर आली आहे. भिवंडी पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत तीन संशयित आरोपींना अटक केली आहे. मुख्य सूत्रधाराच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत.

भिवंडी पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, फरार संशयित मुख्य आरोपी बिजेंद्रकुमार गुप्ता उर्फ बालेश्वरकुमार साह हा मूळचा बिहारच्या समस्तीपूरचा रहिवासी आहे. बिजेंद्र हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशातील अनेक राज्यांमध्ये पेपर लीक केल्याचे गंभीर आरोप आहेत. जुलै २०२३ मध्ये ओडिशामध्ये त्याच्यावर पेपर लीकप्रकरणी दोन गुन्हे दाखल झाले होते. याशिवाय अनेक राज्यांमध्ये तो वॉन्टेड आहे. (पान ४ वर)

## आऊटसोर्स आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्न निकाली काढा- सत्यशोधक संघटनेचे निवेदन



**नंदुरबार, दि.३०- जिल्ह्यातील नेशनल हेल्थ मिशन अंतर्गत कार्यरत आउटसोर्स कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन, शासनमान्य वेतन, वार्षिक वेतनवाढ, बेकायदेशीर वेतन कपात तसेच वैधानिक सुविधा यांसह विविध प्रलंबित प्रश्न तात्काळ निकाली काढावेत, या मागणीसाठी सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी संघटनेच्या नेतृत्वाखालीसत्यशोधक कंत्राटी कर्मचारी संघटना, नंदुरबार यांच्या वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले.**

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नंदुरबार जिल्ह्यातील युपीएचसी, एसडीएच, जिल्हा रुग्णालय (सिव्हील), पीएचसी आणि युएचडब्ल्यूसी येथे श्रीराम प्रिंटिंग प्रेस, नंदुरबार या आउटसोर्स एजन्सीमार्फत कार्यरत शेकडो कर्मचाऱ्यांना गेल्या अनेक महिन्यांपासून आर्थिक व प्रशासकीय अन्याय सहन करावा लागत आहे. कोरोना काळापासून आरोग्य विभागाची जबाबदारी प्रामाणिकपणे सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन, वेतनवाढ आणि कायदेशीर सुविधा नाकारल्या जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

संघटनेने प्रशासनाकडे गेल्या सहा महिन्यांपासून रखडलेले वेतन तात्काळ अदा करण्याची मागणी केली आहे. कर्मचाऱ्यांना केवळ दोन महिन्यांचे वेतन देण्यात आले असून उर्वरित चार महिन्यांचे वेतन अद्याप थकीत असल्याचे सांगण्यात आले. तसेच शासनाने मंजूर केलेल्या आदेशानुसार कोणतीही कपात न करता पूर्ण वेतन देण्यात यावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात सत्यशोधक शेतकरी सभा व सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेच्या वतीने अप्पर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे तसेच जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांना निवेदन देण्यात आले असून, कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने निर्णय न झाल्यास पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.

यावेळी आर टी गावित, विक्रम गावित, विश्वास गावित, दिनेश पावरा, प्रवीण चौधरी, अतुल गोजरे, भावेश गीते, मनोहर वळवी, रविदास वळवी, बकाराम गावित कल्पेश बागुल आदी उपस्थित होते.

### चांदोडे व तारगेचे कौतुक

## कार उभी करण्यास विरोध केल्याने भर दिवसा तिघांनी चाकूने भोसकले

**धुळे, दि. ३० (प्रतिनिधी) : शहरातील गल्ली क्रमांक सहा मध्ये आज दुपारी साडेतीनच्या सुमारास चारचाकी वाहन उभे करण्यावरून वादविवाद झाला. त्यावेळी कार मधून बाहेर पडलेल्या तीन जणांनी कार उभी करण्यास विरोध करणाऱ्या विशाल खिवसरा आणि राहुल तारगे यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. यावेळी त्याठिकाणी उपस्थित असलेल्या नगरसेवक रोहित चांदोडे व राहुल तारगे यांनी हल्लेखोरांना पकडले. हल्लेखोरांनी दोघांवर धारधार चाकूने वार केला. त्यात खिवसरा गंभीर जखमी झाले आहेत. या प्रकरणी हल्ला करणाऱ्या तिघांना आझादनगर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.**

शहरातील गल्ली क्रमांक सहा मध्ये बहुसंख्य बँकांच्या शाखा आहेत. त्यामुळे या गल्लीतून पायी चालणे देखील कठीण होते. बँकांमध्ये आणि या भागात स्तारावलेल्या दुकांनामध्ये जाणारे नागरिक रस्त्यावरच वाहने उभी करतात. दोन्ही बाजूंनी वाहने उभी राहत असल्याने सुमारे चाळीसफूट रूंदीचा रस्ता पायी चालण्यासाठी देखील उपलब्ध होत नाही. अन्य ठिकाणी रस्त्यांवर उभ्या राहणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई होते. पण, गल्ली क्रमांक सहा कडील परिस्थितीकडे वाहतुक पोलिसांची दुर्लक्ष आहे. या ठिकाणी गंभीर घटना घडल्याशिवाय पोलिस कारवाई करणार नाहीत काय, असा प्रश्न देखील उपस्थित करण्यात आला होता. पण, त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. असे असताना आज दुपारी एच.डी.एफ.सी. आणि आय.डी.बी.आय. बँकेसमोर एम. एच. ४३, बी. के. ५००५ या क्रमांकाची इनोव्हा कार उभी करण्याचा प्रयत्न होत होता. तेव्हा अडथळा निर्माण होईल म्हणून राहुल तारगे यांनी कार उभी करण्यास विरोध केला. मात्र, कार मध्ये असलेल्या तिघांन वाद घातला. वाद विकोपास जाऊ नये म्हणून विशाल खिवसरा यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. पण, कार मधून बाहेर आलेल्या तिघांपैकी (पान ४ वर)

### टीईटी प्रकरणी काँग्रेसचे तिसऱ्या दिवशी आंदोलन

मुंबई, दि. ३०- टीईटी पेपरफुटी प्रकरणी युवक काँग्रेस आक्रमक झाली असून सलग तिसऱ्या दिवशी आंदोलन करून भाजपा महायुती सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांच्या नेतृत्वाखाली युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी विधानभवनाच्या प्रवेश द्वारावर आंदोलन करत शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी राजीनामा देण्याच्या मागणीसाठी जोरदार घोषणाबाजी केली.

रविवारी होणाऱ्या टीईटीचा पेपर शनिवारी ठाण्यात फुटल्याने ही परीक्षा रद्द करावी लागली, यामुळे लाखो परिक्षार्थींचे नुकसान झाले आहे. भारतीय जनता पक्ष महायुतीचे सरकार एक परिक्षाही व्यवस्थित घेऊ (पान ४ वर)

## कृऊबा जवळ बस चिखलात अडकली जेसीबीच्या सहाय्याने बाहेर काढली



**धुळे, दि.३०- धुळे शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात मंगळवारी आठवडी बाजारामुळे मोठी गर्दी झाल्याने सकाळपासूनच वाहतुकीची कोंडी झाली. बाजार समितीपासून पुढील परिसरापर्यंत तसेच चौफुली ते मार्केटपर्यंत दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला. जेसीबी यंत्राच्या सहाय्याने अखेर बस बाहेर काढण्यात आली.**

बस आडकल्याची खबर मिळताच वाहतूक सुरळीत करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे नियोजन केले. त्यानुसार नाशिकहून जळगावकडे जाणारी एमएच ४९/सीटी-१४८० क्रमांकाची इलेक्ट्रिक बस डोंगरे महाराज नगरमार्गे वरखेडी रोडकडे वळविण्यात आली. मात्र, त्या मार्गावर डम्पिंगमधील कचरा, चिखल तसेच रस्त्याचे काम सुरू असल्याने बस चिखलात रुतून बसली. बस बाहेर काढण्यासाठी चालकाने अनेक प्रयतक केले, मात्र त्याला यश आले नाही. त्यामुळे बसमधील सर्व प्रवाशांना खाली उतरविण्यात आले. त्यानंतर जेसीबीच्या सहाय्याने बस चिखलातून बाहेर काढण्यात आली. काही काळानंतर बस पुन्हा मार्गस्थ झाल्याने प्रवाशांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

मंगळवार बाजाराच्या दिवशी कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात वारंवार होणारी वाहतूक कोंडी आणि पर्यायी मार्गांची दुरवस्था यामुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. त्यामुळे बाजाराच्या दिवशी वाहतूक व्यवस्थेचे अधिक प्रभावी नियोजन करावे, अशी मागणी वाहनचालक व नागरिकांकडून होत आहे.

### डी.वाय.एस.पी सुधीर पाटलांचा पोलीस पाटीलांतर्फे सत्कार

शिरपूर, दि.३०- शिरपूर उपविभागीय पोलिस अधिकारी (डीवायएसपी) म्हणून नुकताच पदभार स्वीकारलेल्या सुधीर पाटील यांचा मंगळवारी (दि. जून) रोजी थाळनेर पोलीस स्टेशन हद्दीतील पोलीस पाटील जितेंद्र चौधरी वाठोडे, पिंप्री येथील पोलीस पाटील जयपालसिंह गिरासे, सामाजिक कार्यकर्ते श्री.संतोष धाकड यांच्या हस्ते शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या पुढील यशस्वी प्रशासकीय वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्यात.

श्री. पाटील यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी म्हणून दि. जून रोजी पदभार (पान ४ वर)



## शहादे येथे पावसाळ्यापूर्वी नालेसफाई आरोग्य सभापती पाटील स्वत: मैदानात

**शहादा, दि.३० (का.प्र.) पावसाळा तोंडावर आल्याच्या पार्श्वभूमीवरशहादा नगरपालिका प्रशासनाच्या आरोग्य व स्वच्छता विभागातर्फे शहरात युद्धपातळीवर सुरू असलेली नाले व पाटचाऱ्यांची सफाई आता अंतिम टप्प्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षांनंतर शहरातील सर्व मुख्य नाले आणि पाटचाऱ्यांची पूर्ण क्षमतेने साफसफाई करण्यात आली असून, यामुळे वसाहतींमध्ये पाणी शिरण्याची समस्या मिटणार असल्याने नागरिकांनी प्रशासनाच्या या मोहिमेबद्दल समाधान व्यक्त केले आहे.**

शहादा शहरात गेल्या अनेक वर्षांपासून सर्व मुख्य नाल्यांची व पाटचाऱ्यांची व्यवस्थित सफाई झाली नव्हती. दरवर्षी केवळ नावापुरतीच वरवर सफाई केली जात असल्याने पावसाळ्यात कचरा आणि गाळामुळे गटारी तुंबण्याचे प्रमाण प्रचंड वाढले होते. परिणामी, मुसळधार पाऊस झाल्यास नाल्यांचे पाणी रस्त्यांवर आणि विशेषतः नवीन वसाहतींमधील नागरिकांच्या घरांमध्ये शिरत होते. ही गंभीर समस्या कायमची मिटवण्यासाठी यंदा पालिकेने पावसाळ्यापूर्वीच कंबर कसली आहे.शहादा नगरपालिकेचे आरोग्य सभापती सुनील काशिनाथ पाटील यांनी स्वतः या मोहिमेत लक्ष घातले आहे. त्यांनी शहरातील प्रत्येक प्रभाग, मुख्य नाले आणि पाटचाऱ्यांच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन, स्वतः उभे राहून स्वच्छता विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. शहरात जेसीबी यंत्रांच्या साहाय्याने नाल्यांमधील साचलेला केरकचरा आणि अनेक वर्षांचा जुना गाळ उपसून नाले खोल करण्यात आले आहेत. यामुळे आता पावसाच्या पाण्याचा निचरा वेगाने होईल आणि नाले तुंबणार नाहीत, याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे.शहरात सुरू असलेल्या या धडक नालेसफाई मोहिमेची (पान ४ वर)

### व्यापारी संघ व एबी फाऊं.तर्फे मोफत हृदयरोग तपासणी शिबिर

धुळे, दि. ३० - धुळे शहरातील ३८ विविध व्यापारी संघटनांचे शीर्षक संघटन धुळे व्यापारी महासंघ व एबी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. ३ जुलै रोजी महा रक्तदान शिबिर व निःशुल्क हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर सकाळी ८.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत गरुड मैदान कॉम्प्लेक्स, साक्री रोड, धुळे तसेच श्री जलाराम बाप्पा मंदिर, ८० फूट रोड, धुळे या दोन ठिकाणी एकाच वेळी आयोजित करण्यात येणार आहे.

रक्ताची गरज दिवसेंदिवस वाढत असून अपघातग्रस्त, गंभीर आजारी रुग्ण, शस्त्रक्रिया करणारे रुग्ण तसेच थॅलेसेमिया ग्रस्त बालकांसाठी रक्तदान अत्यंत जीवनदायी ठरते. नागरिकांनी मोठ्या संख्येने या सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन रक्तदान करावे तसेच निःशुल्क हृदयरोग तपासणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. रक्तदान हे सुरक्षित, सोपे आणि आरोग्यासाठी लाभदायक आहे. नियमित रक्तदानामुळे शरीरात नवीन रक्तपेशी तयार होण्यास मदत होते, रक्ताभिसरण सुरळीत राहण्यास हातभार (पान ४ वर)

## शालीनी भदाणेंच्या हस्ते कर्करोग शिबीराचा शुभारंभ




**धुळे, दि.३०- धुळे तालुक्यातील बोरकुंड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कर्करोग तपासणी शिबीर घेण्यात आले. बोरकुंड व परिसरातील नागरिकांची या शिबीरात तपासणी करण्यात आली. यावेळी वैद्यकिय अधिकाऱ्यांसह विविध मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी यावेळी कर्करोगाच्या तपासणीबाबत महत्व विषद केले.**

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मनिष पाटील यांच्या मार्दर्शनाखाली या कर्करोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्य (पान ४ वर)



## अपघातात मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांच्या वारसांना डॉ.मोरेंच्या हस्ते धनादेश सुपूर्द

नंदुरबार, दि.२९(प्रतिनिधी)- जिजामाता शिक्षण संस्थेचे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील अतुल कर्मा वसावे (रा. हुनाखांब ता.अ.कुआ) हा बी.ए.प्रथम वर्गात शिकणारा विद्यार्थी अक्कलकुआ ते नंदुरबार दरम्यान प्रवास करतांना दि.१०/२/२०२६ रोजी अपघातात मृत्यू पावला. मयत विद्यार्थ्यांची माहिती जिजामाता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विजय बोराणे यांना कळताच त्यांनी घडलेल्या घटनेची खातरजमा करून संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती शोभाताई मोरे, उपाध्यक्ष डॉ. विक्रांतजी मोरे, संस्थेचे सचिव डॉ अभिजित मोरे, संचालक एडवोकेट राऊ मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली मयत विद्यार्थ्यांच्या वारसांना आर्थिक सहाय्य मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले आणि आज दि.२७/६/२०२६ रोजी संस्थेचे सचिव डॉ अभिजित मोरे यांच्या हस्ते ओरिएंट इन्सुरन्स कंपनी तर्फे प्राप्त झालेले ४ लाख आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, कुलगुरू सहायता निधीतून प्राप्त झालेल्या १० हजार असे एकूण चार लाख दहा हजार रुपयांचा धनादेश मयत विद्यार्थ्यांच्या मातोश्री श्रीमती मसलीबाई वसावे व जेष्ठ बंधू (पान ४ वर)

**मुंबई, दि.३०- राज्यातील वृक्षलागवड मोहिमेला अधिक प्रभावी आणि शाश्वत स्वरूप देणे आवश्यक आहे. यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, खासगी -सार्वजनिक सहभाग (पीपीपी), ग्रामपंचायतींचे वृक्षलागवडीचे नियोजन आणि विविध विभागांचा समन्वय यावर भर देण्यात यावा. यंदा १८ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट असून योग्य नियोजन आणि सर्व यंत्रणांच्या सहभागातून हे उद्दिष्ट पूर्ण करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे निर्देश

## अठरा कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नियोजन करावे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली हरित महाराष्ट्र आयोगाच्या वृक्षारोपण मोहिमेची आढावा बैठक झाली. यावेळी वन मंत्री गणेश नाईक, 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा मुख्यमंत्री फडणवीस यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रविण परदेशी, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, कृषी सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे, विश्वेसरैया इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्रा. आर. के. इंगळे, सेवानिवृत्त सनदी अधिकारी प्रमोद बोंगीरवार, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, वन अधिकारी हे दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी श्री.परदेशी यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात व्हि बी-जी राम जी योजनेअंतर्गत वृक्षलागवड वाढविण्यावर भर द्यावा. यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने उपलब्ध जमिनीचे नियोजन करून ग्रामसभेच्या (पान ४ वर)

### रायफल फायरींगमध्ये हिमांशू पवार प्रथम

धुळे, दि.३०- ४८ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, धुळे यांच्या वतीने आयोजित दहा दिवसीय विशेष एनसीसी शिबिरात सेंट अँथनी स्कूलच्या छात्र सैनिकांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा नावलौकिक वाढविला. शिबिरात सहभागी झालेल्या ४४१ छात्र सैनिकांमध्ये सेंट अँथनी स्कूलचा विद्यार्थी हिमांशू पवार याने रायफल फायरिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत बेस्ट फायररचा मान मिळविला.

शिबिरा दरम्यान ४८ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल सुदीप मिश्रा यांनी छात्र सैनिकांना मार्गदर्शन करत एकाग्रता, शिस्त आणि अचूक निशाणेबाजीचे महत्त्व पटवून दिले. अनुभवी लष्करी अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना रायफल हाताळणी व सुरक्षित फायरिंगचे सखोल प्रशिक्षण दिले. शिबिरात सेंट अँथनी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे फादर विल्सन रॉड्रिक्स यांनी सर्व छात्र सैनिकांचे अभिनंदन करत त्यांच्या मेहनतीचे आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाचे कौतुक केले. भविष्यातही विद्यार्थी अशाच प्रकारे उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचे व जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## राज्य कर्जात बुडताना कंत्राटदार आत्महत्या करताहेत मग सरकारचे विकासाचे दावे कसे : अंबादास दानवे



मुंबई, दि. ३० : सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, पाणीपुरवठा आणि इतर विभागांची मिळून सुमारे ९६ हजार ४०० कोटी रुपयांची देयके थकित आहेत. ही बिले न मिळाल्याने अनेक कंत्राटदार आर्थिक संकटात सापडले आहेत. सांगली जिल्ह्यातील जलजीवन मिशनचे कंत्राटदार हर्षल पाटील आणि नागपूरचे कंत्राटदार पी. व्ही. वर्मा यांच्यासह चार कंत्राटदारांनी आत्महत्या केल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. काम पूर्ण करूनही पैसे न मिळणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे दानवे यांनी सांगितले. विधिमंडळ पावसाळी अधिवेशनात राज्य सरकारने मांडलेल्या पुरवणी मागण्यांवर चर्चा झाली. चर्चेत विरोधी पक्षाच्या वतीने बोलताना शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांनी आज राज्याच्या आर्थिक धोरणावर आणि विकासाच्या प्राधान्यक्रमावर जोरदार टीका केली.

राज्यावर प्रचंड कर्जाचा डोंगर असताना सरकार विकासाचे मोठे दावे करत आहे. मात्र प्रत्यक्षात कंत्राटदारांची थकित देयके, जलजीवन मिशनची रखडलेली कामे, मराठवाडा-विदर्भातील सिंचनाचा अनुशेष, शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील दयनीय परिस्थिती आणि ग्रामीण भागातील मूलभूत प्रश्नांकडे सरकारने दुर्लक्ष केल्याचा आरोप दानवे यांनी केला. राज्यात जल जीवन मिशन योजनेअंतर्गत सुमारे ५१ हजार कामांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी जवळपास २४ हजार कामे पूर्ण, तर २६ हजार कामे अद्याप अपूर्ण आहेत. जलजीवन मिशनचीच सुमारे ३५ हजार कोटी रुपयांची थकबाकी असून योजना पूर्ण करण्यासाठी आणि देखभालीसाठी सहा हजार ८०० कोटी रुपयांची गरज आहे. मात्र पुरवणी (पान ४ वर)

## होळच्या वारकरी दिंडीचे भव्य स्वागत आरोग्य तपासणी व रेनकोटचे वाटप

**धुळे, दि.३० - शिंदखेडा तालुक्यातील होळ येथील स्वर्गीय ह.भ.प. तुळशीराम बाबा पाटील यांच्या स्मरणार्थ गेल्या सुमारे ५० वर्षांपासून पंढरपूरकडे पायी निघणाऱ्या वारकरी दिंडीचे रविवारी (दि. २८) धुळ्यात उत्साहात स्वागत करण्यात आले. सुमारे ११० वारकऱ्यांचा समावेश असलेल्या या दिंडीचे विविध गावांमध्ये स्वागत केले जात असून, धुळ्यात कान्हादेश वारकरी सेवा मंडळ व आमदार अनुप अग्रवाल यांच्या ए.बी. फाऊंडेशनच्या वतीने विशेष सेवा उपक्रम राबविण्यात आला.**

गल्ली क्रमांक ५ येथील कान्हादेश वारकरी सेवा मंडळाच्या कार्यालयात वारकऱ्यांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली. तसेच पावसाळ्याचा विचार करून प्रत्येक वारकऱ्याला प्लास्टिक रेनकोट, आरोग्य तपासणी करून औषधांचे किट वितरित करण्यात आले. (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,29,650 रु.+3% GST
सोने- 24 K -1,41,500 रु.+3% GST
चांदी- 2,25,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

# आपला महाराष्ट्र

# देव चोरूनी नेईल अशी कोणाची पुण्याई

आपल्याकडे श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील सीमारेषा फारच पुसट आहेत. सर्व कर्मकांडांना लोक श्रद्धा म्हणतात. त्यामुळे मंदिरे उभारणे, त्यासाठी पैसा गोळा करणे, त्यात मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करणे, होम हवन करणे, त्यातून पुन्हा पैशांची उभारणी करणे, त्या पैशांचा विनियोग लोकसेवेसाठी करणे, इमारती बांधणे, भक्त निवास बांधणे, संबंधित परिसर पर्यटनाच्या स्वरूपात पेश करणे, त्यातून पैसा उभारणे, शिक्षण संस्था काढणे, हॉस्पिटलची उभारणी करणे, त्यातून पैशांची निर्मिती करणे, या सगळ्या चक्राला श्रद्धा म्हटले जाते. आधीच पोथ्या पुराणे पारायणे, यज्ञ, सत्यनारायणाची पूजा, नारायण नागबळी, अधिष्ठान, असे कितीतरी प्रकार कर्मकांडात बसणारे आहेत त्याला देखील श्रद्धा म्हणून पेश केले जाते आणि मानले जाते. समाजातील बहुतांश घटक याच पद्धतीने अध्यात्माकडे बघतो. विनोबांनी अध्यात्माची व्याख्या फार सुंदर शब्दात केलेली आहे. विज्ञान आणि आत्मज्ञान म्हणजे अध्यात्म असे विनोबा म्हणतात. त्यात अशा प्रकारचे कर्मकांड कुठेच बसत नाहीत. आत्मज्ञान कर्मकांडातून प्राप्त होते ही बाब अजून सिद्ध झालेली नाही. तपश्चर्यातून होते की नाही होत ते ज्याचे त्यालाच माहीत आपण फक्त ते गृहीत धरलेले असते. असे सगळे पगडे आपल्यावर असतात. त्यातून ईश्वराचे अस्तित्व असल्याचा भास आपल्याला होतो.

ही सृष्टी चाललेली आहे मग याचा नियंत्रक कोणी तरी असेल अशी आपली भावना असते आणि ती तपासण्याच्या भानगडीत आपण पडत नाही. त्यामुळे कर्मकांडवाद्यांचे फावते आणि त्यांना झुंडीने शिकारी सापडतात. वर्षानुवर्षे हे धंदे चालू आहेत. तीर्थयात्रा करणे, तिथे घाण करून येणे, प्रदूषण निर्माण करून येणे, तिथल्या नदीत डुंबणे, आणि देव सगळे काही करेल तो बघत असतो असे गृहीत धरून त्याला काहीतरी दान देऊन येणे ही बाब देखील आपण वर्षानुवर्षे बघत आहोत. सरकारच खुद्द तीर्थयात्रांचे आयोजन करते तसा सरकारवर आरोप आहे. राज्यघटनेतील तरतुदीनुसार अशा पद्धतीचे उपक्रम चालवण्याची जबाबदारी सरकारची नाही. पण आता धर्म आणि राजनीति हातात हात घालून चालत असल्यामुळे सगळे काही चालते असे बहुतेकांनी गृहीत धरले आहे. त्यामुळे सर्व तीर्थक्षेत्रे पर्यटन क्षेत्रात सरकारनेच परिवर्तित केलेले असल्याचे विचारवंत म्हणतात. सरकारचे हे मूलभूत कार्य आहे असे लोकांच्या मनात ठसविण्यात देखील एक यंत्रणा यशस्वी झालेली आहे. म्हणूनच शासक पक्षाला भरभरून मते मिळतात हे उघड आहे. या सर्व प्रक्रियेत कुठेही आत्मज्ञान नावाची गोष्ट दिसत नाही. कर्मकांड हेच आत्मज्ञान आहे. आणि ते पुण्याचे काम आहे असे बहुतेकांना वाटते त्यामुळे ते देवाला साकडे घालत असतात आणि दानही करीत असतात.

दान प्रचंड प्रमाणावर गोळा होते. त्या त्या ठिकाणचे प्रमुख त्याचा हिशोब ठेवतात आणि ट्रस्टमध्ये जमा करतात. मात्र त्यात मोठ्या प्रमाणावर चोऱ्या होऊ लागल्या आणि त्या चोऱ्या गृहीत धरण्यात येतात असा आपला धर्म असल्याचे मानणारा मोठा वर्ग आहे. देव आपल्याला मिळालेल्या दानाचे देखील रक्षण करू शकत नाही हे वास्तव मात्र कोणीही स्वीकारायला तयार नाही. या निमित्ताने मुद्दा अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या दानातील अपहाराबद्दल उपस्थित झालेला आहे. अनेक दिवस त्यावर कोणीच भाष्य करीत नव्हते. आजही वरिष्ठ पातळीवर कोणी काही बोलत नाही. ही बाब जर काँग्रेस शासन काळात उजागर झाली असती तर शासक पक्षाने आणि त्याच्या तथाकथित भक्तांनी सारा देश डोक्यावर घेतला असता. पण आता श्रीरामाच्या दानासंबंधीच्या चोरी बद्दल कोणीच काही बोलत नाही. सोयीप्रमाणे त्यांच्या नैतिकतेच्या व्याख्या सुद्धा ठरलेल्या असतात. त्यानुसार सारे काही घडत आहे. परंतु देशभर चर्चा उपस्थित झाल्यामुळे श्रीराम मंदिर ट्रस्टच्या संबंधित काही लोकांना अटक करण्यात आली आहे.त्यात संपत्तीची मोजदाद करणारे कर्मचारी आणि असेच कोणीतरी आहेत. त्यांच्या पाठीमागे असलेल्या कुणाचीही नावे अद्यापि बाहेर आलेली नाहीत. ती येणारही नाहीत तसा बंदोबस्त केलेला असतो.जे पकडले आणि तुरूंगात पाठविले ते काहीच बोलणार नाहीत अशी व्यवस्था करण्यात येत असते असाही आपला अनुभव असल्याचे जाणकार सांगतात.नाशिकला ज्या पध्दतीने खरातचे वाभाडे निघाले आणि तोच सध्या चर्चेचा विषय आहे पण त्याचे बोलविते धनी कोण त्या विषयीची चर्चा होणार नाही अशी व्यवस्था काम करीत आहे. तसे श्रीराम मंदिर ट्रस्टच्या संदर्भात होईल. सध्या मीडियाने या घटनेची फारशी दखल घेतलेली नाही.कदाचित तशा सूचना त्यांना दिलेल्या असाव्यात अशी शंका अनेकांच्या मनात आहे..म्हणूनच एवढी मोठी अपहाराची घटना घडली आणि मीडिया त्यावर भाष्य करीत नाही यातच सारे काही आले.

यापैकी कुणालाच श्रीरामाचे नाव घेण्याचा अधिकार नाही.ज्या पध्दतीने समाजात विभाजनाची पेरणी शासक पक्षाने केली,मंडल आणि कमंडलची सांगड घातली,सत्ता प्रस्थापित केली.बाबरीचा विध्वंस केला. शाही मंदिराची उभारणी केली त्यासाठी हजारो कोटी रूपये सरकारच्या माध्यमातून खर्ची पडले.लोकांनी करोडो रूपये आणि दागदागिने दिले त्यावरच डल्ला मारला.रक्षकच भक्षक बनले.कदाचित आता असेही म्हटले जाईल की,प्रभू श्रीरामाने बरोबर हिशोब केला. चोरांना तुरूंगात पाठविले.मग त्यांना चोरीची इच्छा कोणत्या प्रेरणेतून झाली तेही भक्तांनी सांगितले पाहिजे.कारण ते मंदिर ट्रस्टचे अविभाज्य अंग आहेत.श्रीराम मंदिराच्या दानातून झालेला करोडोंचा अपहार ही साधी सुधी गोष्ट अजिबातच नाही.मात्र त्याबाबत फार काही गांभीर्याने हे प्रकरण सरकार व त्या पक्षाने घेतलेले नाही.लोकभावना भडकू नयेत म्हणून थातूर मातूर कारवाई केली जात आहे.खरे तर यावर लोकांनीच आता पुढाकार घेऊन पाप पुण्याच्या व्याख्या नेमक्या कुठल्या यावरचा अभ्यास करून मार्गदर्शक तत्वे स्वतःच स्वत:साठी तयार केली पाहिजेत. आपण दान सत्पात्री करीत आहोत की नाही याचा विचार केला पाहिजे.शिक्षण,आरोग्य, तंत्रज्ञान, विवेकवादी प्रबोधन, यासाठी आपण आर्थिक मदत करण्यास हात आखडता घेतो पण मंदिरास दान करण्यात आपला पुढाकार असतो.त्यामुळे भरपूर मंदिरे श्रीमंत झाली आहेत.या श्रीमंतीचे वैभव कशासाठी असा प्रश्न कोणीच उपस्थित करीत नाही.केल्यास आपण अपराधी सिध्द होऊ अशी त्यांची भावना तयार होते म्हणून कोणीच बोलत नाही ही वस्तुस्थिती आहे.मराठीत एक सुंदर गीत आहे.देव देव्हाऱ्यात नाही,देव नाही देवालयी,देव चोरूनी नेईल अशी कोणाची पुण्याई

देव मूर्तीत ना मावे तीर्थक्षेत्रात ना गावे
देव आपणात आहे शीर झुकवोनिया पाहे
तुझ्या माझ्या जड देही देव भरुनिया राही
देव देव्हाऱ्यात नाही देव नाही देवालयी

गदिमांनी या अभंग गीतातून अंधश्रध्दाळूंच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातलेले आहे.पण आपण बुध्दीप्रामाण्य मानायला तयार नसल्याने घोटाळे होतात. सध्या प्रत्येक गावात आणि कॉलनीत मंदिरांचे पेव फुटले असून बहुतेक चोरांनीच त्यांच्या उभारणीत सहभाग नोंदविलेला खोलात गेल्यावर दिसेल असे सर्रास म्हटले जाते..म्हणजे पैसा अवैध, जागा अवैध, वीज जोडणी अवैध,सारेच चोरीचे आणि तरीही देव भक्तांसाठी सगळे मान्य करतो त्याला सगळे दिसते. असे म्हणणे किंवा मानणे हे अजबच तर्कशास्त्र म्हटले पाहिजे.परिणामी खाली चोर तर वरती डाकू भक्तांची मांदियाळी असल्याचे स्पष्ट होते. देव मुकाटपणे सारे काही बघतो आणि होऊ देतो. हे कोडे काही केल्या सुटत नाही. शिकल्या सवरलेल्यांनीही डोळ्यांना पट्ट्या बांधलेल्या आहेत.देवांच्या मूर्ती चोरून नेणारे देखील मौजुद आहेत. एकदा नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींचे दैवत याहा मोगी देवीची मूर्ती कोणीतरी चोरून नेली होती.ते चोर काही सापडले नाहीत.मग दुसरी मूर्ती विराजमान झाली.ती कशी झाली ते सर्वांनाच माहित आहे.तसलेच प्रकार सगळीकडे चालू असून अयोध्येतील मंदिर ट्रस्ट मधील चोरी त्याच प्रवृत्तीतील लोकांनी केलेली आहे. तरीही सत्यवचनी राम त्यांना माफ करतील अशीही धारणा बनेल आणि तशी चर्चा सुरू होईल. अकराव्या शतकाच्या पूर्वार्धात अफगाणिस्तानचा सुलतान महमूद गझनी याने भारतात येऊन सोरटी सोमनाथ मंदिर लुटून उध्वस्त केले होते त्याचा इतिहास आपण पुन्हा पुन्हा आठवतो.पण इथे उभारणारे आणि लुटणारेही स्वकियच आहेत हे महत्वाचे. पण आता असेही म्हटले जाईल की, चोरांना जात नसते आणि धर्मही नसतो. चौर्यकर्म हाच त्यांचा धर्म असतो पण अशा चोरांच्या हातातच तिजोरीच्या चाब्या दिल्या त्यावर कोणी बोलणार नाही.

# मावळ्यांची जपणूक करणारे राजे छ.शिवाजी महाराज- प्रा.प्रकाश पाठक

**धुळे, ता.३० : छत्रपती शिवाजी महाराजांनी औरंगजेबाच्या कैदेतून आपली करून घेतलेली सुटका, ही घटना जगाच्या इतिहासातील अत्यंत स्पृहणीय असलेली म्हणजे आजही इतिहासाला आश्चर्य वाटणारी आहे. या सर्व घटनांनंतर वयाच्या ४४ व्या वर्षी झालेला राज्याभिषेकाचा सोहळा पृथ्वीशी राजाचे असलेले नाते प्रस्थापित होण्याकरिता महाराजांनी स्वीकारला. राजा व्हावे ही गरज आहे आणि तुमचे राजेपण इतरांमध्ये दरारा निर्माण करणारे आहे असे जगाला कळावे, म्हणून हा राज्याभिषेकाचा सोहळा झाला. छत्रपती शिवाजी महाराज हे मावळ्यांची जपणूक करणारे राजे होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत, व्याख्याते प्रा. प्रकाश पाठक यांनी केले.**

भारतीय जनता पक्ष, पक्षाची आध्यात्मिक आघाडीतर्फे हिंदू धर्म पंचागांनुसार शौर्य, स्वाभिमान आणि हिंदू धर्म संरक्षणाचा गौरवशाली दिवस म्हणजे हिंदू साम्राज्य दिन तथा शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्या येथील मालेगाव रोडवरील जनसंपर्क कार्यालयात शनिवारी दि.२७ जून व्याख्यानाचा कार्यक्रम झाला, त्यात प्रा. पाठक बोलत होते. आमदार अनुप अग्रवाल, महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्सना पाटील, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, भाजप जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, ज्येष्ठ नेते भीमसिंह राजपूत, विजय पाच्छापूरकर, सुधाकर बेंद्रे, डॉ. सुशील महाजन, महादेव परदेशी, आध्यात्मिक आघाडीचे अध्यक्ष सुनील वाघ, ओबीसी आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष हिरामण गवळी, माजी महापौर प्रदीप कर्पे, प्रतिभा



चौधरी, कल्पना महाले, महिला आघाडीच्या अध्यक्षा सुवर्णा पाटील, भिकन वराडे यांच्यासह भाजपचे नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करत अभिवादन करण्यात आले. हिरामण गवळी यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला.

**छत्रपतींचे चारित्र्य उच्चकोटीचे : प्रा. पाठक**

प्रा. पाठक म्हणाले, की छत्रपती शिवाजी महाराजांच्या निवर्तनानंतर खुद्द औरंगजेबानेही मनापासून कौतुक केले होते. तो म्हणाला होता, की छत्रपती शिवाजी महाराज खूप शूर, बहादूर, लढवय्ये होते. यापेक्षा विशेष म्हणजे शत्रूही मिळावा, तर शिवासारखा. याची दोन कारणे. एक म्हणजे त्यांच्या दरबारातला एकही मावळा विकावू नव्हता आणि दुसरी म्हणजे त्यांचे चारित्र्य खूप धवल, स्वच्छ होते. त्यांच्या दरबारात गेलेली कुठलीही स्त्री जशी माहेराहून सासरी परत येते तसा आदर, सत्कार, सन्मान प्रत्येक स्त्रीला मिळत असे. माणसे जेव्हा विकली जात नाहीत आणि माणसांचे चारित्र्य जेव्हा उत्तम असते तेव्हा राज्य शिवाजींचे असते.

प्रा. पाठक म्हणाले, की शिवाजी महाराजांच्या सैन्य दलातील तसेच दरबारातील सरदार, मावळे हे स्वराज्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराजांसाठी नेहमी काहीही करायला तयार असत. बहिर्जी नाईकांसारख्या शूर मावळ्यांनी आणलेल्या गुप्त माहितीमुळे छत्रपती शिवरायांना अनेक मोहिमा यशस्वी करता आल्या. मावळ्यांना कधीही न विसरणारा राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होते. कारण राजे अतिसूक्ष्म विचार करून त्यानुसार वाटचाल करणारे राजे होते. त्या कालखंडात छत्रपती शिवाजी महाराज जन्मले नसते, तर आज भारताचे चित्र वेगळेच राहिले असते. सुनील वाघ यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. भाजपचे महानगर जिल्हा उपाध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

## पटेल सैनिकी शाळेत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

शिरपूर, दि.३०- श्री. विलेपार्ले केळवाणी मंडळ मुंबई संचलित तांडे येथीलमुकेशभाई आर. पटेल सैनिकी शाळेत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळा प्राचार्य दिनेशकुमार राणा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला.

सर्वप्रथम ज्येष्ठ शिक्षक सतीश सोमवंशी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी मधुर गीत सादर करत आपली प्रस्तुती केली. विद्यार्थिनी मनुश्री पाटील हिने आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी संस्कृती टापरे हिने केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयतक केले.

**NAME CHANGE**

I HAVE CHANGE MY NAME FROM **KHALIL SHAIKH TAYYEB KHATIK** TO **KHALIL TAYYAB KHATIK**

ADD- KHATIK BHAVAN JAVAL, MOHAMMADI NAGAR, DEOPUR, DHULE-424002

**NAME CHANGE**

I HAVE CHANGE MY NAME FROM **SHAZMEEN BI SHAIKH SAEED** TO **SHAZMEEN BEG AKIL BEG MIRZA**

ADD- PLOT NO.22, JANTA SOCIETY, WADJAI ROAD, DHULE-424001

**प्रकाश में आज**




जितेंद्र, हेमा मालिनी, शत्रुघ्न सिन्हा, अमृतासिंग, कादर खान, किमी काटकर

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस, सर्व हित संबंधितांना तसेच सर्व वित्तीय संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,खालील परिशिष्ठात नमूद केलेल्या मिळकतीचे मालक ज्योती रमेश विसपुते आणि संध्या सुनिल सातपुते यांच्यशी आमचे अशिल यांनी खालील नमूद मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचा सौदे करार केलेला असून लवकरच सदर खरेदीचा व्यवहार पूर्ण होणार आहे.सदर मिळकतीच्या टायटल व्हेरिफिकेशन हेतू सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.

सदर मिळकतीत कोणाचेही कोणतेही प्रकारचे मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, कोणाचेही गहाण, बोजा, टांच, जप्ती, भाडेपट्टा वा लिज हक्क, ताबा हक्क या सौदेकरार हक्क अगर खरेदी हक्क वगैरे काहीही असल्यास किंवा संकल्पीत व्यवहारास कोणत्याही प्रकारे हरकत वा विरोध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत त्याबद्दल स्वत:च्या हक्काच्या प्रमाणीत झेरॉक्स प्रतिसह आम्हास खालील नमूद पत्त्यावर लेखी कळवावे. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा तसेच दस्त ऐवजांशिवाय घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

नियोजित मुदतीत कोणाचीही साधार व लेखी तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्बोज असून तथाकथीत हक्क व अधिकार संबंधितांनी सोडून दिलेले आहे. असे समजून सदर व्यवहार पूर्ण करण्यात येईल. यानंतर कोणीही काहीही तक्रार, हितसंबंध अगर हक्क दाखविल्यास ते आमचे अशिल आणि सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. कळावे.

**परिशिष्ट :** मौजे देवपूर ता. जि.धुळे येथील धुळे म.न. पा. हद्दीतील सर्व्हे क्रमांक ६१/४ पैकी प्लॉट क्रमांक १४४ चे एकूण क्षेत्र २०५.०० चौ.मी. (२२०५.०८ चौ. फुट) यासी सिटीसर्व्हे क्रमांक ३९१३ चे क्षेत्र २०४.७० चौ. मी.ची असलेली बखळ प्लॉट मिळकत आणि यावर असलेले जुने लोडबेरींग बांधीव घर, यासी चतु:सिमा येणे प्रमाणे

पुर्वेस : प्लॉट नं. १४७ पश्चिमेस : प्लॉट नं. १४५

दक्षिणेस : वापर व त्यापुढील ६ मी. रोड उत्तरेस : मंगलम मंगल कार्यालय

सदर जाहीर नोटीस अशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे, दि. ३०/०६/२०२६.

**ॲड.शैलेश मदनलाल पंसारीया**

ऑफिस : ६७, मुरलीधर भाईजी नगर, चक्करबर्डी रोड, धुळे ४२४००१

मो.९७६६२५५७७९/९१७२१८१७७७

**जाहीर नोटीस**

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज नं.४९७/२०२६, नि.

शालिग्राम हिलाल करंके (पाटील)
रा.तऱ्हाडी त.त., ता.शिरपूर, जि.धुळे. ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

X

कै.हिलाल शामराव पाटील, (मृत्यू ता.१६/१०/१९९३)
रा.तऱ्हाडी त.त., ता.शिरपूर, जि.धुळे. ....मयत

ज्याअर्थी मयत हिलाल शामराव पाटील हे दि.१६/१०/१९९३ रोजी मौजे- तऱ्हाडी त.त. ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झाले असून, अर्जदार हाच एकमेव त्यांचा कायदेशीर वारस असल्याबाबत मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ चे कलम २ अन्वये वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय तसेच औपचारीक कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दिवसांच्या आत दि.२३/७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल. दि.२९/४/२०२६

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे — (शिक्का) — सहा.अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस तसेच बँका, पतसंस्था इतर वित्तीय संस्था, शासकीय, निमशासकीय संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : मौजे कासविहिर ता. जि.धुळे येथील.

१) ग. नं. ४६/२ चे क्षेत्र हे. ७-०२ आर पो. ख. ६८ आर एकूण ७-७० आकार रु. २७-०५ पै.

२) ग. नं. ४६/३क चे क्षेत्र हे. ६-८७ आर पो. ख. ३२ आर एकूण ७-१९ आकार रु. ६-८७. पै.

**यासी चतु:सिमा गाव नकाशा प्रमाणे :**

येणे प्रमाणे .मिळकतीचे मालक किरण रमेश देवरे यांनी आमचे अशिले यांच्यासोबत सौदा केला आहे. सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षिस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे, अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. ०७ दिवसानंतर आलेल्या हरकती लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचाही कोणतेही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती वरुन व सांगितलेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिले असे.

धुळे दि. ३०/०६/२०२६

**ॲड.उमेश व्ही. मुसळे**

प्लॉट नं. ३१, कृष्णा सोसायटी
एकता नगर, नकाणे रोड,
देवपूर, धुळे ४२४००२
मो. ८४८३८७०६२८,८४८५८१६२८३

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे पैकी धुळे म. न. पा. हद्दीतील मौजे बिलाडी येथील स. नं. २५७/१अ/१ब/१क/म. अ. प्र. प्लॉट नं. १ अ मो. प्र. प्लॉट नं.१ ते प्लॉट नं. ८१ मो. प्र. प्लॉट नं. ८६ असे एकूण ८६ बखळ प्लॉटसचे एकूण क्षेत्र ९८०३.४८ चौ. मी. बखळ प्लॉट.

**यासी मापे व चतु:सिमा मंजूर लेआउटप्रमाणे**

सदरची मिळकत गोकुळ घेवरचंद बाफना वगैरे-४, रा. सिल्लोद यांचे यांच्या मालकीची ताबे उपभोगातील असून सदर मिळकत आमचे अशिलांनी कायम स्वरुपी विकत घेण्याचा सौदा करार केलेला आहे. त्यापोटी बयाणा रक्कम देखील अदा केली आहे. उर्वरित रक्कम देवून खरेदी व्यवहार पूर्ण करावयाचा आहे. सदर मिळकतीसंबंधी कोणाचाही,खरेदी, विक्री, टाच, जप्ती, गहाण, भाडे, करारनामा, वाटणी हक्क, वारसा हकक, वहिवाट हक्क, पतपेढी बोजा, बँक बोजा, जनरल मुखत्यार, अगर इतर हस्तांतरीत हक्क असल्यास आमचे अशिलांना कळणे आवश्यक आहे. त्यासाठी सदरची जाहीर नोटीस दिली असे.

वरील जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कोणाचेही हरकती अथवा तक्रार अथवा हक्क अधिकार असल्यास लेखी स्वरुपात कळविण्यात यावे तसेच मुळ कागदपत्र दाखवून आमचे अशिलाची खात्री करुन द्यावी. वरील मुदतीत कोणाचेही लेखी हरकती अथवा तक्रारी न आल्यास खरेदी व्यवहार पूर्ण केला जाईल. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
धुळे दि. ३०/०६/२०२६

**ॲड.योगेश सुभाष शिंदे**

एफ-४४, पहिला मजला, स्किम ए. गरुड मैदान संकुल, कमलावाई शाळेसमोर, साक्री रोड, धुळे ४२४००१ धुळे.
मो. ९४०३७६२८३४

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे देवपूर ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. १०६/२/८ यापैकी प्लॉट नं. १२ चे क्षेत्र १९० चौ. मी. यांसी वि.सि.स. नं. ८२४६ चे एकूण क्षेत्र १९० चौ. मी.सत्ता प्रकार क यापैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ९२.५० चौ. मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : स. नं. १०५, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : याच प्लॉट नं. १२ पैकी उर्वरित भाग, उत्तरेस : ओपन स्पेस, येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत १) सौ. रंजना गणेश ढोले, २) श्री. गणेश खंडू ढोले, दोघे रा. ६७ राधाकृष्ण कॉलनी, बिलाडी रोड, शिरपूर धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदरहू मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, कब्जापावती, मुखत्यारपत्र, रक्कम देणे/ घेणे, आरक्षण, कोर्ट वाद, सॉल्व्हन्सी, इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मुळ दस्त जमा/ तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्राच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निर्बोज आहे असे समजून संबंधितांस तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. ३०/०६/२०२६

**ॲड.विजय म. मोरे**

नोटरी भारत सरकार
रा. बी/१२ भन्साली प्लॉझा,
नगरपट्टी, धुळे मो. ९८२२८५२६५०

**जाहीर हरकत**

आमचे अशिल श्री. क्षितीज दिनेशकुमार बागुल उ. व. १८, धंदा : शेती, रा. प्लॉट नं. ५७, प्रमोद नगर, देवपूर धुळे यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन हरकत घेण्यात येते की,

तुम्ही तुमचे अशिल श्री. मगन हुसेन भिल (मोरे) यांच्या वतीने दिनांक २५/०६/२०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या टायटल व्हेरिफिकेशन जाहीर नोटीशीच्या अनुषंगाने आमचे अशिल श्री. क्षितीज दिनेशकुमार बागुल यांच्या वतीने खालील प्रमाणे हरकत नोंदविण्यात येत आहे.

तुमच्या अशिलाने मौजे नकाणे,ता. जि. धुळे येथील गट क्र. ७७/९/अ, क्षेत्र १ हे.०० आर. आकार २ रुपये ०० पैसे या मिळकतीबाबत आमच्या अशिलांस दिनांक ०१/०९/२०२३ रोजी मा.नोटरी सो. धुळे यांचे समक्ष सौदापावती करुन दिलेली आहे.

सदर करारानुसार एकूण विक्री किंमत रक्कम रुपये ६,३०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सहा लाख तीस हजार मात्र) निश्चित करण्यात आली असून सदर संपूर्ण रक्कम तुमच्या अशिलाने दिनांक १९/०९/२०२३ रोजी आमच्या अशिलांच्या भारतीय स्टेट बँक शाखा प्रमोद नगर,देवपूर धुळेच्या धनादेश क्रमांक ७७६१५० द्वारे स्विकारलेली आहे.

सदर सौदापावतीमध्ये सदरहू जमीन ही नवीन शर्तीची असल्याने तिच्या हस्तांतरणावर बंदी असल्याने तिची शासनाकडून विक्रीची परवानगी मिळाल्यानंतर सदरहू जमीन ही खरेदी करुन मा. निबंधक सो. धुळे यांचे समक्ष तुमच्या अशिलाने आमच्या अशिलाच्या नावे नोंदणीकृत खरेदीखत करुन देण्याचे सदरहू सौदापावतीत मान्य केले आहे.

त्यामुळे सदर मिळकतीवर आमच्या अशिलाचा कायदेशीर हक्क निर्माण झालेला आहे. अशा परिस्थितीत तुमच्या अशिलाने तृतीय पक्षास कोणत्याही प्रकारचे हक्क निर्माण करुन देणे,विक्री करणे किंवा व्यवहार करणे हे बेकायदेशीर, करारभंग करणारे व आमच्या अशिलाच्या हक्कांना बाधा आणणारे ठरेल.

म्हणून तुमच्या अशिलाने सदर मिळकतीबाबत कोणताही पुढील व्यवहार करु नये. अन्यथा आमच्या अशिलांना सर्व दिवाणी व फौजदारी उपाययोजना करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. त्यास होणारा सर्व खर्च नुकसान व परिणाम यास सर्वस्वी तुमचे अशिल जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

म्हणून सदर जाहीर नोटीशीची नोंद घेतांना आमच्या अशिलाचा वरील प्रमाणे असलेला हक्क विचारात घेण्यात यावा व सदर हरकत अभिलेखावर घेण्यात यावी.

ही हरकत पुराव्यासह कायदेशीर मुदतीत सादर करण्यात येत आहे.
येणे प्रमाणे हरकत असे. धुळे दि. ३०/०६/२०२६

**ॲड.निलेश भास्कर कुलकर्णी**

जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे मो. ९१५८६५७६५८




**जाहीर नोटीस**

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनि.डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.५२१/२०२६, नि.

१) कलाबाई आत्माराम धनगर, २) मनोज आत्माराम धनगर,
नं.१ व २ रा.जातोडे ता.शिरपूर, जि.धुळे,
३) मनिषा योगेश निळे, रा.१०८, शिवाजीनगर मोतीबा स्कूल हटकेश्वर महादेव अहमदाबाद जि.अहमदाबाद
४) ज्योती ज्ञानेश्वर धनगर, रा.वैंदाणे ता.जि.नंदुरबार,
५) जयश्री मुकेश पवार,
रा.करंनखेडा ता.अमळनेर, जि.जळगांव. ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही. ....जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार कलाबाई आत्माराम धनगर वगैरे यांनी मे.न्यायालयात नामे आत्माराम सभा धनगर हे दि.१०/०७/२०२५ रोजी मौजे जातोडे ता.शिरपूर जि.धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे आत्माराम सभा धनगर यांचे वारसांबाबत वर नमुद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि.२९/०७/२०२६ रोजी ठिक १०:३० वाजता मे.न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजुर करून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि.१२/०६/२०२६

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर — (शिक्का) — सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

**नोटीस-जाहिरनामा**

**शिरपूर येथील मे.कार्यकारी दंडाधिकारी सो., तथा मे.तहसिलदार सो. यांचे कोर्टात**

मृत्यू नोंद अर्ज नं.---/२०२६, नि.

काशिराम सखाराम भिल,
रा.वरझडी ता.शिरपूर, जि.धुळे ....अर्जदार

विरूध्द

म.ग्रामपंचायत अधिकारी सो.,
ग्रामपंचायत कार्यालय, वरझडी,
ता.शिरपूर, जि.धुळे. ....जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी म.तहसिलदार सो, शिरपूर यांचे न्यायालयात दाखल केलेल्या अर्जानुसार अर्जदाराचे आजोबा नामे- तुकाराम भिका भिल यांचा मृत्यू दि.२७/०९/२००५ रोजी मौजे वरझडी ता.शिरपूर जि.धुळे येथे मृत्यू झालेबाबत मृत्यू नोंद प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार याने महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (२)(३) प्रमाणे मृत्यू नोंद होणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जास कोणाची काहीएक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास अर्ज दाखल केल्याचा दिनांक पासून त्यांनी १० दिवसाच्या आत कार्यकारी दंडाधिकारी शिरपूर यांच्या न्यायालयात, स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काहीएक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल. प्रसिध्द दिनांक- / /२०२६, ठिकाण

नोटीस प्रसिध्द करणार संबंधित अर्जदारतर्फे

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर — (शिक्का) — सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

**जाहीर नोटीस**

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज नं.५२४/२०२६, नि.६५

१) प्रमिलाबाई तोंगल पाटील, रा.कवळीथ, ता.शहादा, जि.नंदुरबार,
२) मीराबाई बाप विक्रम पाटील, रा.तऱ्हाडी त.त., ता.शिरपूर, जि.धुळे,
३) हिराबाई रमेश साळुंखे (पाटील), रा.असलोद, ता.शहादा, जि.नंदुरबार
४) अप्रुकबाई अशोक पाटील,
रा.नावरी, ता.जि.धुळे. ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

X

१) कै.विक्रम सुका पाटील, (मृत्यू ता.२५/०३/२००९),
२) कै.अनुसयाबाई विक्रम पाटील, (मृत्यू ता.२०/०८/२०१३),
दोन्ही रा.तऱ्हाडी त.त., ता.शिरपूर, जि.धुळे. ....मयत

ज्याअर्थी मयत विक्रम सुका पाटील हे दि.२५/०३/२००९ रोजी व मयत अनुसयाबाई विक्रम पाटील ह्या दि.२०/०८/२०१३ रोजी मौजे- तऱ्हाडी त.त. ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झाले असून, अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ चे कलम २ अन्वये वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय तसेच औपचारीक कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि.२१/७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल. दि.२९/६/२०२६

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे — (शिक्का) — सहा.अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे

## पटेल आश्रमशाळेत शिवराज्याभिषेकोत्सव

शिरपूर, दि.३०- शहरातील आर. सी. पटेल अनुदानित आश्रमशाळेत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवराज्याभिषेकोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आर.एस. कुलकर्णी होते. सी.एन. कोळी व एस.एल. निकुंभे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.ए. गोपाळ यांनी व आभार डी.जे. वाघ यांनी मानले.


## जाहीर हरकत नोटीस

तमाम लोकांना व जनतेस तसेच १) श्री. भटू पंडीत धनगर रा. लामकानी ता. जि. धुळे ह. मु. धुळे २) ईश्वर नथ्थु धनगर रा. लामकानी, ता. जि. धुळे ३) दशरथ नामदेव ठेलारी रा. लोणखेडे ता. साक्री जि. धुळे ४) सखाराम कडू ठेलारी रा. लोणखेडे ता. साक्री जि. धुळे यांना जाहीर नोटीसीद्वारे जाहीर हरकत घेण्यात येते ती येणे प्रमाणे.

आमचे अशिल सौ. वर्षा जितेंद्र धनगर (तेले) द्वारा : गुलाब तानकु धनगर रा. थाळनेर ता. शिरपूर जि. धुळे हिचा विवाह श्री. भटू पंडीत धनगर यांचा मुलगा नामे जितेंद्र भटू धनगर यांच्याशी दिनांक १०/०३/२०१९ रोजी हिंदुधर्म शास्त्र पद्धतीने व जातीरिवाजानुसार रामनगर, प्लॉट नं. ५२,सेक्टर २ वाडीभोकर रोड, धुळे येथे संपन्न झालेला आहे. सदर विवाहातून उभयतांना एक मुलगा नामे प्रद्युम्न झालेला आहे. जितेंद्र धनगर व आमचे अशिल यांच्यामध्ये कौटुंबिक वाद सुरु आहेत. त्याबाबत प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

आमच्या अशिलाचे आजल सासरे यांच्या नावे मौजे लोणखेडे ता.साक्री जि. धुळे. शिवारात गट क्रमांक व उपविभाग १७३/१/१/अ क्षेत्र ६.४८.०० आकार ६.१० पो. ख. ०.३५.०० हा आजल सासरे मयत पंडीत साधु धनगर यांच्या नावे होता. पंडीत धनगर हे दिनांक १५/०४/२०१६ रोजी मयत झाले. त्यानंतर भटू धनगर यांनी वारस लावण्यासाठी अर्ज दिला व भटू धनगर, हिरामण धनगर असे दोन भाउ व सुशिला धनगर, रजुबाई धनगर अशा दोन बहिणी सदरवर नमूद मालमत्तेला कायदेशीर वारस हक्काने शेवटचा फेरफार नोंद १४५१ने दिनांक २५/०२/२०२० रोजी कायदेशीर वडिलोपार्जित वर नमूद मिळकतीस कायदेशीर वारस लागले.

सदरची वर नमूद मिळकत ही वडिलोपार्जित व एकत्र कुटुंबाची आहे. सदर मिळकतीत आमच्या अशिलाचा व अशिलाच्या मुलाचा कायदेशीर अविभाज्य असा हिस्सा आहे. परंतु आमच्या अशिलाचे व भटू धनगर यांचा मुलगा जितेंद्र यांच्यात कौटुंबिक वाद चालू आहे. या कारणास्तव आमच्या अशिलास व आमच्या अशिलाच्या मुलास कुठल्याही प्रकारे वडिलोपार्जित वर नमूद मिळकतीत हिस्सा मिळू नये म्हणून भटू पंडीत धनगर व इतर यांचे भाउ व बहिण हे परस्पर सदर वर नमूद मिळकतीचा वर नमूद लोकांशी आर्थिक व्यवहार करीत आहेत व सदर मिळकत त्यांना विकत आहे असे आमचे अशिलांना समजले म्हणून आमचे अशिल सदरची मिळकत ही वडिलोपार्जित आहे. तिच्याशी कोणीही आर्थिक व्यवहार करु नये तसेच नजरगहाण अगर, खरेदीखत, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र अशा प्रकारे कुठलाही दस्त करु नये व सदरची मिळकत हस्तांतरीत करु नये.

सदर वर नमूद मिळकत मौजे लोणखेडे ता.साक्री शिवार गट क्र. व उपविभाग १७३/१/१/अ क्षेत्र ६.४८.०० आकार ६.१० पो. ख. ०.३५.०० वरील मिळकत वडिलोपार्जित असल्यामुळे कोणीही कुठल्याही प्रकारे खरेदीखत अगर कुठलाही दस्त करु नये.केल्यास सदरचा दस्त अगर खरेदीखत आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही. आमच्या अशिलास सदर बेकायदेशीर व्यवहाराबाबत मे.कोर्टात जावे लागेल.त्या संपूर्ण खर्चास व परिणामास बेकायदेशीर व्यवहार करणारे व विक्री करणारे जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे आमचे अशिलाची जाहीरपणे हरकत आहे.

धुळे दि. ३०/०६/२०२५

**ॲड.दिपक विश्राम साळुंखे**

प्लॉट नं. ७८, शिवसुंदर इंद्रप्रस्थनगर, नकाणेरोड,
गौरी मिरची कांडपसमोर, देवपूर धुळे मो. ८८०६१५१२९९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँक वित्तीय संस्था, पतसंस्था, सावकार व सर्व संबंधितांना व रानुबाई रामडू अहिरे (चांभार), कमळबाई तुळशिराम अहिरे (चांभार), रोहिदास तुळशिराम अहिरे (चांभार), भाईदास तुळशिराम अहिरे (चांभार), मोतीलाल तुळशिराम अहिरे (चांभार) सर्व रा. कमखेडा, ता. शिंदखेडा जि. धुळे आणि हिराबाई नारायण अहिरे (चांभार) ह. रा. सुरत गुजरात यांना श्री. उत्तम शंकर अहिरे (चांभार) रा. कमखेडा ता. शिंदखेडा जि. धुळे यांचेतर्फे आमचे मार्फत जाहीर नोटीस देण्यात येते ती येणे प्रमाणे.

मौजे कमखेडा ता. शिंदखेडा जि. धुळे येथील जुना सर्व्हे नं. १४/२(अ),१४/२(ब) व १४/२(क) एकूण क्षेत्र १० एकर १४ गुंठे यापैकी सर्व्हे नं. १४/२(क), एकूण क्षेत्र ४ एकर ३० गुंठे ही मिळकत नोटीस देणार यांचे वडील शंकर उखडू चांभार यांचे नावे व ताबे उपभोगातील होती, त्यांच्या मृत्यूनंतर सदरचे क्षेत्र नोटीस देणार यांचे ताबे उपभोगात आहे.

शासनाने जमीन एकत्रीकरण योजने अंतर्गत वरील नमूद ३ ही सर्व्हे नं. १४/२(अ),१४/२(ब) व १४/२(क) या तीनही मिळकती गट नं. ८ लावण्यात आला आहे. सदर क्षेत्रास गट नं. ८ लावतेवेळी त्यात महसूल कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे किंवा अनावधानाने सदर गट नं. ८ मध्ये शंकर उखडू चांभार यांचे नाव लावले गेले नाही असे असले तरी सदर गट नं. ८ मध्ये १ हे. २७ आर. अधिक ० हे. ६३ आर. पो. ख. एकूण ४ एकर ३० गुंठे हे क्षेत्र नोटीस देणार यांचे ताबे उपभोगात आहे. नोटीस देणार यांचे ताब्यात असलेल्या मिळकतीच्या चतु:सिमा पुर्वेस : हुंबरडे वाले यांचे शेती, पश्चिमेस : बैलगाडी रस्ता, दक्षिणेस : रोहिदास उर्फ बाळासाहेब कोळी यांचे शेत, उत्तरेस : रामडू उखडू यांचा गट नं. ८ मधील शेत हिस्सा.

सदर मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर रानुबाई रामडू अहिरे (चांभार), कमळबाई तुळशिराम अहिरे (चांभार), रोहिदास तुळशिराम अहिरे (चांभार), भाईदास तुळशिराम अहिरे (चांभार), मोतीलाल तुळशिराम अहिरे (चांभार) सर्व रा. कमखेडा, ता. शिंदखेडा जि. धुळे आणि हिराबाई नारायण अहिरे (चांभार) ह. रा. सुरत गुजरात यांची नावे आहेत ही मंडळी ७/१२ उताऱ्यातील त्यांचे नावाचा गैरफायदा घेवून सदर मिळकतीची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्नात असल्याचे समजल्याने नोटीस देणार यांनी दि. ०९/०५/२०२४ रोजी दैनिक आपला महाराष्ट्र या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस दिलेली आहे. सदर मंडळी वर नमूद मिळकतीची विल्हेवाट लावण्याची शक्यता पुन्हा निर्माण झाली आहे. त्यामुळे सदर जाहीर नोटीस द्यावी लागत आहे.

सदर मिळकतीचे वाटपाबाबत शिंदखेडा न्यायालयात नियमित दरखास्त नं. १८/२०१८ रानुबाई रामडू अहिरे यांनी दाखल केली आहे. सदर दरखास्त मध्ये उत्तम शंकर अहिरे यांनी हरकत घेवून सदर गट नं. ८ मध्ये त्यांचा वडिलोपार्जित १ ते २७ आर अधिक ० हे. ६३ आर. एकूण १ हे. ९० आर (४ एकर ३० गुंठे) ह्या मिळकतीची वाटणी करण्यात येवू नये व सदर क्षेत्र संपूर्ण गट नं. ८ मधुन पृथक करुन वेगळे करुन मिळावे असा अर्ज न्यायालयात दाखल केलेला आहे. सदर प्रकरणाची पुढील दि. २३/०७/२०२६ असून गट नं. ८ संबंधीचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

तरी तमाम जनतेस व संबंधितांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद गट नं. ८ संबंधी खरेदी विक्री, गहाण, भाडे, करार, अगर इतर कोणतेही तबदिलीचे व्यवहार करु नये, असे व्यवहार झाल्यास ते नोटीस देणार यांचेवर व त्यांचे ताब्यातील मिळकतींवर बंधनकारक राहणार नाही व सदर व्यवहार बेकायदेशीर ठरेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे मार्फत दिली असे. दि.३०/०६/२०२६ येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

सही

**ॲड.आर. एम. निकम** मो. ९४२१२७७८०७

ऑफिस : २१२, ॲडव्होकेट चेंबर, न्यायालय आवार, धुळे
निवास : रमा निवास २६ विनोद नगर, नेताजी कॉलनीजवळ, देवपूर धुळे

## NAME CHANGE

MY OLD NAME WAS
**GAUTAM RAMESH PUNJABI**
AND NOW MY NEW NAME IS
**GAUTAM RAMESH PUNJABI BHASIN**
ADD- RAMSING NAGAR PUNJABI SAW MILL NEAR BUS STAND SHIRPUR, DIST.DHULE-425405

## CHANGE NAME

MY OLD NAME WAS
**ZULEKHA BANO SHAIKH RAMZAN PINJARI**
MY NEW NAME IS
**JULEKHA HIDAYAT PINZARI**
ADD- HOUSE NO.11, CHALISGAON ROAD, AVISHKAR COLONY, TAL.DIST.DHULE-424001 MS

## CHANGE NAME

MY OLD NAME WAS
**JAHEDA BI SHARIFUDDIN**
MY NEW NAME IS
**JAHEDA BI RAISODDIN KHATIB**
ADD- 0, AGRA ROAD, BEHIND L M SARDAR SCHOOL, LALA SARDAR NAGAR, DEVPUR, TAL.DIST.DHULE-424002 MS

## CHANGE NAME

MY OLD NAME WAS
**PINJARI HIDAYATALI SHAIKH AMIR**
MY NEW NAME IS
**HIDAYAT AMEER PINZARI**
ADD- HOUSE NO.11, CHALISGAON ROAD, AVISHKAR COLONY, TAL.DIST.DHULE-424001 MS

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मौजे महिंदळे येथील कुमारनगर भागातील सि. स. नं. ५६३४ चे एकूण क्षेत्र ७६.८० चौ. मी. (ब्लॉ नं. एफ/५ रुम नं. ५ पुर्वेकडून) यात जुने विटा माती पत्रा मधील बांधीव घर व उर्वरित बखळ जागेसह. सत्ता प्रकार अ.**

**यासी चतु:सिमा**

पुर्वेस : ब्लॉक नं. एफ ५ रुम नं. ४ सि. स. नं. ५६३५
पश्चिमेस : ब्लॉक नं. एफ ५ रुम नं. ६ सि. स. नं. ५६३३
दक्षिणेस : रस्ता व वापर उत्तरेस :रस्ता व वापर

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल **यांनी मिळकतीचे मालक श्री.कैलास द्वारकादास** पोपली रा. ३९/ब पाडवी हौसिंग सोसायटी, साक्री रोड, धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा करार, बक्षिस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी, विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही. तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. ३०/०६/२०२६

**ॲड.रोहित राजकुमार छाबिडया**

ब्लॉक नं. आर/२, रुम नं. १, कुमारनगर, साक्री रोड, धुळे
मो. ९९२२८२८८८३/७४९९९९८९५५

## ANAND SADAN SOCIETY CANOSSA PRIMARY, SECONDARY & HIGHER SECONDARY SCHOOL

Amode, Shirpur, Dist.Dhule-425405

**VACANCY**

Applications are invited for the following post:

**1. Teacher- B.ED. (Hindi) 2.**

Intersted candidates may submit their application along with self-attested copies of the required documents at the School Office on or before 03 July 2026.

Office Hours: 9:00 a.m. to 11.00 a.m.
Phone : 02563-299110

**Headmistress**
Canossa Primary, Secondary & Higher Secondary School Amode, Shirpur. Tal.Shirpur, Dist.Dhule-425405

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मौजे कुंडाणे (वार) ता. जि. धुळे येथील गट नं. ३६/४/ब चे क्षेत्र ला. ला. ० हे. ३८ आर. + पो. ख. ० हे. ०० आर. - एकूण ० हे. ३८ आर आकार १ रु. १७ पै. यापैकी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण नवी दिल्ली साठी संपादित क्षेत्र ० हे. ०२ आर. वगळून उर्वरित क्षेत्र ला. ला. ० हे. ३६ आर. + पो. ख. ० हे. ०० आर. - एकूण ० हे. ३६ आर आकार १ रु. ११ पै. जिरायत शेतजमीन वापर व रस्ता वहिवाटीप्रमाणे भोगवटा वर्ग १.**

**यासी चतु:सिमा**

पुर्वेस : गट नं. ३६/३/अ पश्चिमेस : गट नं. ३६/४/अ/२
दक्षिणेस : रामदास बळीराम यांचे शेत उत्तरेस : सुरत नागपूर महामार्ग

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल **यांनी मिळकतीचे मालक श्री. कैलाश टेकचंद रेलन** रा. गुरुनानक सोसायटी, साक्री रोड, धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा करार, बक्षिस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी, विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही. तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. ३०/०६/२०२६

**ॲड.रोहित राजकुमार छाबिडया**

ब्लॉक नं. आर/२, रुम नं. १, कुमारनगर, साक्री रोड, धुळे
मो. ९९२२८२८८८३/७४९९९९८९५५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मौजे कुंडाणे (वार) ता. जि. धुळे येथील गट नं. ३६/४/अ/२ चे क्षेत्र ला. ला. ० हे. ३७.७९ आर. +पो. ख. ० हे. ०० आर. -एकूण ० हे. ३७.७९ आर आकार १ रु. १९ पै. जिरायत शेतजमीन वापर व रस्ता वहिवाटी प्रमाणे, भोगवटा वर्ग १..**

**यासी चतु:सिमा**

पुर्वेस : गट नं. ३६/४/ब पश्चिमेस : गट नं. ३६/५/क
दक्षिणेस : झिंगा बळीराम यांचे शेत उत्तरेस : सुरत नागपूर महामार्ग

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल **यांनी मिळकतीचे मालक श्री.संजय टेकचंद रेलन रा. गुरुनानक सोसायटी, साक्री रोड, धुळे** यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा करार, बक्षिस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी, विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही. तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. ३०/०६/२०२६

**ॲड.रोहित राजकुमार छाबिडया**

ब्लॉक नं. आर/२, रुम नं. १, कुमारनगर, साक्री रोड, धुळे
मो. ९९२२८२८८८३/७४९९९९८९५५

## जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट संचालित झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे.

**खुली मुलाखत- Walk in Interview**

आमच्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता खाली दर्शविलेल्या पदवी, पदव्युत्तर व कायम विना अनुदानित विषयांसाठी व्याख्याता पदाच्या तात्पुरत्या स्वरुपात नेमणुका करावयाच्या आहेत. पात्र उमेदवारांनी अर्जासोबत मूळ शैक्षणिक कागदपत्रे व सत्यप्रतींसह खालील तक्त्यात दिलेल्या तारीख व वेळे प्रमाणे महाविद्यालयात प्रत्यक्ष मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहावे.

| विभाग | विषय व पद संख्या | मुलाखतीचा वार दिनांक व वेळ | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| विनाअनुदानित पदवी वर्गासाठी | संगणकशास्त्र-२, माहितीतंत्रज्ञान-५, जैवतंत्रज्ञान-२, संस्कृत-१, संगीत-१ | सोमवार दि.०६/०७/२०२६ सकाळी १०:०० वाजता | संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी- नेट, सेट अथवा पीएच. डी. पात्र असल्यास प्राधान्य. अनुभवी उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |
| विनाअनुदानित मॅनेजमेंट पदवी वर्गासाठी | संगणकशास्त्र-९, वाणिज्य व व्यवस्थापन-३, गणित-१, इंग्रजी-१, | सोमवार दि.०६/०७/२०२६ सकाळी ११:३० वाजता | |
| विनाअनुदानित पदव्युत्तर वर्गासाठी | संख्याशास्त्र-२, भूगोल-२, सुक्ष्मजीवशास्त्र-४, संगणकशास्त्र-२, माहिती तंत्रज्ञान-२, रसायनशास्त्र-५, वाणिज्य-१, इंग्रजी-१, मराठी-१. | सोमवार दि.०६/०७/२०२६ दुपारी ०२:०० वाजता | |
| अनुदानित पदवी वर्गासाठी विद्यापीट परिनियम ४१५(३) नुसार घडयाळी तासिका तत्वावर | इंग्रजी-२, हिंदी-४, इतिहास-१, भूगोल-४, संरक्षण व सामरीक शास्त्र-१, राज्यशास्त्र-३, अर्थशास्त्र-६, समाजशास्त्र-२, वाणिज्य-७ | मंगळवार दि.०७/०७/२०२६ सकाळी १०:०० वाजता | UGC व म. शा. निर्णय संकीर्ण २०१८ (१८५/१८) मशि-३ दि.१४/११/२०१८ नुसार ठरवून दिलेल्या आवश्यक शैक्षणिक पात्रता उदा. संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी व नेट, सेट अथवा पीएच. डी. पात्र |
| | वनस्पतीशास्त्र-९, प्राणीशास्त्र-६, सुक्ष्मजीवशास्त्र-५, भूगर्भशास्त्र-६, गणित-३, संख्याशास्त्र-७, रसायनशास्त्र-२१, पदार्थविज्ञान-१५, इलेक्ट्रॉनिक्स- ६ | मंगळवार दि.०७/०७/२०२६ दुपारी ०२:०० वाजता | |

१) सदरची पदांची तसेच तासिकांची संख्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये संबंधित विषयास उपलब्ध विदयार्थी संख्येवर अवलंबून राहतील.

२) अनुदानित तासिका तत्वासाठी शैक्षणिक पात्रता, वेतनश्रेणी, सेवाशर्ती इ. महाराष्ट्र शासन, विद्यापीठ, UGC यांच्या नियमाप्रमाणे राहिल त्यासाठी उमेदवारांनी महाविद्यालयाचे www.zbpatil.in हे संकेतस्थळ पाहावे.

३) ज्या विषयांची पूर्णवेळ रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु असेल ती पदे भरेपर्यंत अनुदानित घडयाळी तासिका तत्वावरील पदांना मान्यता राहिल. नियमित पदे भरली गेल्यास कार्यभारा अभावी तासिका तत्वावरील नियुक्त केलेल्या व्यक्तिची सेवा आपोआप समाप्त होईल. तसेच शैक्षणिक पात्रता, तासिकेनुसार देय वेतन व पदाचे स्वरुप इ. महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार राहिल.

**(डॉ.ए.ए.पाटील)**
**प्र.प्राचार्य**
**झु.भि.पाटील महाविद्यालय, धुळे.**

**(श्री.विजय पितांबर पाटील)**
**चेअरमन**
**जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट, धुळे**

## महाराष्ट्र शासन
## जलसंपदा विभाग

कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, नंदुरबार यांचे कार्यालय
(दुरध्वनी क्रमांक-०२५६४-२२००६६) ई-मेल पत्ता:- eemechnandurbar@gmail.com

**ई-निविदा सूचना क्र.०६ सन-२०२६-२७.**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, नंदुरबार जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन सक्षम निवीदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवत आहेत. निविदा कागदपत्रे शासना संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निवीदेबाबत सर्व माहित शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निवीदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, नंदुरबार यांनी राखुन ठेवल आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर ई निवीदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | जिल्हा | निवीदेची किंमत रुपये |
|---|---|---|---|
| १ | सन २०२६-२७ मधील पावसाळी हंगामात वाडीशेवाडी प्रकल्प ता.शिंदखेडा, जि.धुळे या प्रकल्पावरील द्वारांचे परिचलनाकरीता आवश्यक मनुष्यबळाचा पुरवठा करणे व वक्रद्वारांचे देखभाल दुरूस्तीचे कामे करणे. | धुळे | १०,८२,७९५/- |

**ई निविदेचे वेळापत्रक**

१) ई निविदा दस्तऐवज डाउनलोड प्रारंभ व समाप्त दिनांक :- व वेळ — दि.०९/०७/२०२६ सकाळी ११.०० पासून ते दि.१६/०७/२०२६ संध्याकाळी ०६.०० पर्यंत

२) ई निविदा दाखल करण्याची सुरुवात व अंतिम दिनांक व :- वेळ — दि.०९/०७/२०२६ सकाळी ११.०० पासून ते दि.१६/०७/२०२६ संध्याकाळी ०६.०० पर्यंत

३) ई निविदा तांत्रिक देकार उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ :- — दि.२०/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, नंदुरबार यांचे कार्यालयात ऑनलाईन उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास)

जा.क्र. लेखा-१/६८९/सन-२०२६
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, नंदुरबार,
दि.२९/०६/२०२६.
**जाहिरात क्र जिमाका/धुळे/जाहि/६०/२०२६-२७**

**(नि.पां.खडसे)**
**कार्यकारी अभियंता**
**यांत्रिकी विभाग, नंदुरबार.**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व हितसंबंधीतांना तसेच सर्व वित्तीय संस्था व स्थानीक स्वराज्य संस्था यांना या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परीशिष्टात नमूद केलेली मिळकतीचे मालक मोहिनी विलास हिरे रा. मु.पो.वडफळया, शिक्षक कॉलनी, ता.अक्राणी जि.नंदुरबार-४२५४१४ याच्यांशी आमचे अशिल यांनी खालील नमूद मिळकत कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरवले असून लवकरच सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण होणार आहे, सदर मिळकतीच्या टायटल व्हेरीफिकेशन हेतू सदर जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

सदर मिळकतीत कोणाचेही कोणतेही प्रकारचे मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, कोणाचेही गहाण, बोजा, टांच, जप्ती, भाडेपट्टा वा लिज हक्क, ताबा हक्क वा सौदेकरार हक्क अगर खरेदी हक्क वैगेरे काहीही असल्यास किंवा संकल्पीत व्यवहारास कोणत्याही प्रकारे हरकत वा विरोध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आंत त्याबददल स्वताच्या हक्काच्या प्रमाणीत झेरॉक्स प्रतिसह आम्हास खालील नमूद पत्त्यावर लेखी कळवावे, परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा तसेच दस्तऐवजांशिवाय घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

नियोजीत मुदतीत कोणाचीही साधार व लेखी तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्बोज असून तथाकथीत हक्क व अधीकार संबंधीतांनी सोडून दिलेले आहे असे समजून सदर व्यवहार पूर्ण करण्यात येईल. या नंतर कोणीही काहीही तक्रार, हितसंबंध अगर हक्क दाखविल्यास ते आमचे आशिल आणि सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी, कळावे.

**परिशिष्ट**

मौजे भदाणे ता.जि.धुळे येथील गट नं.५१९ चे क्षेत्र ला.ला १ हे ४९ आर + पो.ख. ०० हे ०० आर असे एकूण क्षेत्र १ हे ४९ आर, आकार रू.२.६० पैसे मात्रची असलेली शेत जमीन मिळकत, यांसी चतु:सिमा गावनकाशाप्रमाणे व वहीवाटीप्रमाणे आणि येणे प्रमाणे असे.

पुर्वेस- भटाई माता मंदीर रस्ता,
पश्चिमेस- गट नं.३९८ (उत्तम दोधा भिल),
दक्षिणेस- राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-६,
उत्तरेस- गट नं.५१८ (एकनाथ रामदास सुर्यवंशी)

सदर जाहीर नोटीस अशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. दिनांक- २६/०६/२०२६.

**ॲड.शैलेश मदनलाल पंसारीया**

ऑफिस- ५, दिघे ॲडव्होकेटस चेंबर्स, धुळे जिल्हा कोर्टासमोर, स्टेशन रोड, धुळे-४२४००१.
**मो.नं.९७६६२५५७७९, ९१७२१८१७७७**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे मोहाडी प्र.ल. येथील महानगरपालिका हद्दीतील.

७/१२ उताराप्रमाणे :- गट./स.नं.३१ पै ३२/१ ते ३ पैकी प्लॉट नं.६ चे एकूण क्षेत्र ४५०.०० चौ.मी. यापैकी दक्षिणेकडील भागाचे क्षेत्र ७२.४९ चौ.मी. ७८० चौ.फुट बखळ प्लॉट.

सि.स.उताराप्रमाणे :- सि.स.नं.१०७ चे एकूण क्षेत्र ४५५.८० चौ.मी. यापैकी दक्षिणेकडील भागाचे क्षेत्र ७२.४९ चौ.मी. ७८० चौ.फुट बखळ प्लॉट हे इम्रान खान मोहम्मद खान पठाण रा.१७, मिल्लत नगर, बंदे नवाज मस्जीद जवळ, धुळे यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजूर नकाशाप्रमाणे.

मिळकतीचे मालक इम्रान खान मोहम्मद खान पठाण रा.१७, मिल्लत नगर, बंदे नवाज मस्जीद जवळ, धुळे यांचे तर्फे विशेष मुखत्यार म्हणून सादिक अहमद सलाउद्दीन शेख रा.ब्लॉक नं.२७, रूम नं.१६३/१६४, कामगार नगर, हजार खोली, मदनी मस्जीद जवळ, धुळे, यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरूपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदा केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क, हस्तांतरण व्यवहार, खरेदी, सौदापावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्युपत्र, मुख्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणेप्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरून, माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. दिनांक- ३०/०६/२०२६.

**ॲड.दानिश अहमद अ.रऊफ (शेख)**

पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर, ८० फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे.
**मो.नं.९८८१९२९४२४**

## जाहीर नोटीसीस उत्तर

श्रीमती अपर्णा शैलेश जाधव रा.धुळे यांना तसेच तमाम जनता, सर्व वित्तीय कंपन्या, बँका पतसंस्था यांना जाहीर नोटीस उत्तराने कळविणेत येते की,

श्रीमती अपर्णा शैलेश जाधव यांनी दिनांक २७/०६/२०२६ रोजीच्या दैनिक आपला महाराष्ट्र या वर्तमानपत्रातून ॲडव्होकेट अजय आर.जाधव यांचे मार्फत प्रसिध्द केलेली जाहीर नोटीस, खोटी, चुकीची व बेकायदेशीर असून आमच्या आशिल रेखा किसनराव जाधव यांना मान्य व कबुल नाही.

सदर जाहीर नोटीसीत नमूद मिळकत आमचे अशील श्रीमती रेखा किसनराव जाधव यांनी स्वकष्टार्जीत व पुर्णतः स्वमालकीची मिळकत होती. सदर मिळकत कोणत्याही प्रकारे तबदील करण्याचा अधिकार आमचे अशिलास असल्याने, त्यांनी नोंदणी कृत बक्षीस पत्राने त्यांची मुलगी सौ.सुषमाराणी आनंदराव काटकर यांना दिलेली आहे व तेव्हापासून सदर मिळकतीवर सौ. सुषमाराणी आनंदराव काटकर यांचा ताबा आहे.

जाहीर नोटीसीत नमूद मिळकतीशी श्रीमती अपर्णा शैलेश जाधव यांचा काडीमात्रही संबंध नाही. त्यामुळे सुषमाराणी आनंदराव काटकर, या, सदर मिळकतीशी करणार असलेल्या व्यवहाराशी श्रीमती अपर्णा शैलेश जाधव यांचा अगर, कोणत्याही वित्तीय संस्था, बँका, कोणताही संबंध नसल्यामुळे त्यांना, पुढे होणाऱ्या कोणत्याही व्यवहाराशी संबंध नाही याची नोंद सर्व संबधीतांनी घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस उत्तर असे.

सदर जाहीर नोटीस उत्तर आमचे अशिल श्रीमती रेखा किसनराव जाधव यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे मार्फत दिली असे.

धुळे, दिनांक- ३०/०६/२०२६.

**ॲड.संजय दिनकर भट**

११०, प्रभात नगर, डी सी कॉलेज रोड, देवपूर, धुळे.
**मो.नं.९८२२२५७०२१**

## जाहीर नोटीस

श्री.अनिल डी.सराफ, ॲडव्होकेट, शहादा
ता.शहादा, जि.नंदुरबार

**म.दिवाणी न्यायाधिश सो., (व.स्तर) शहादा यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज क्रं.१४७/२०२६

श्री.दिपक मनोहर सोनार, उ.व.६०, धंदा- मजुरी,
रा.तिलक चौक, सोनार गल्ली,
शहादा, ता.शहादा, जि.नंदुरबार. ....अर्जदार

**विरूध्द**

कोणीही नाही ....जाबदेणार
कै.मनोहर पुरूषोत्तम सोनार, (मृत्यू दि.०८/०१/२०१८) ....मयत

अर्ज:- दि.बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चॅप्टर VIII चे कलम २ व ७ प्रमाणे वारस दाखला (Heirship Certificate) दाखला मिळणेसाठी

ज्याअर्थी अर्जदाराचे वडील मयत कै.मनोहर पुरूषोत्तम सोनार यांचा मृत्यु दि.०८/०१/२०१८ रोजी मौजे शहादा, ता.शहादा, जि.नंदुरबार येथे झालेला असून त्यांचे पश्चात त्यांना वारस क्र.१) दिपक मनोहर सोनार-मुलगा, २-अ) कल्पना रविंद्र सोनार- सुन, २-ब) रूपेश रविंद्र सोनार- नात, ३-अ) यमुना प्रमोद सोनार- सुन, ३-ब) विश्वजीत प्रमोद सोनार- नातु हे कायदेशीर वारस असल्याने वर नमूद अर्जदाराने सन १८२७ चे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टमधील ८ चे कलम २ व ७ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी शहादा येथील म.दिवाणी न्यायाधिश सो. (व.स्तर) यांचे कोर्टात दि.१३/४/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील अर्जासंदर्भात कोणास काही म्हणणे अगर हरकत असल्यास ते दि.२२/७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतःअगर वकिलांमार्फत शहादा येथील म.दिवाणी न्यायाधिश सो. (व.स्तर) शहादा यांचे न्यायालयात हजर राहुन लेखी सादर करावे, अन्यथा सदर अर्जाच्या बाबतीत कोणाचीही काहीएक तक्रार नाही असे गृहीत धरण्यात येवून पुढील योग्य ते हुकूम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

आज तारीख ३०/६/२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी सदरची जाहिर नोटीस दिली असे.

आदेशावरून

**क.लिपीक** — दिवाणी न्यायालय व.स्तर, शहादा
**अधिक्षक** — दिवाणी न्यायालय व.स्तर, शहादा

## पान १ वरुन

### उपसभापतीपदासाठी अर्ज देत सचिन अहिर यांचा

उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना वरळी मतदारसंघात मोठा फटका बसला आहे. वरळी मतदारसंघात ठाकरे गटाचे दोन आमदार होते. त्यातील एक सचिन अहिर होते. खासदार संजय दिना पाटील यांच्या पक्षात वाढत्या प्रभावामुळे सचिन अहिर नाराज होते. मागील काही दिवसांपासून ते शिंदे गटाच्या संपर्कात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शिंदे शिवसेनेकडून त्यांना थेट विधान परिषदेच्या उपसभापतीपदाची संधी देण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर त्यांनी तातडीने हा निर्णय घेतल्याची माहिती समोर येत आहे. सचिन अहिर यांच्याकडे कामगार संघटनांची मोठी ताकद असून, पक्ष संघटनेतही त्यांचे मोठे योगदान होते. त्यामुळे त्यांचा हा प्रवेश ठाकरे गटाच्या पायाखालची वाळू सरकवणारा ठरला आहे.

**ज. मु. अभ्यंकर मविआचे उमेदवार**

महाविकास आघाडीने विधान परिषद उपसभापतीपदाच्या निवडणुकीसाठी राजकीय निर्णय घेतला. संख्याबळ कमी असल्याची जाणीव असूनही आघाडीने निवडणुकीच्या मैदानात उतरण्याचा निर्धार केला. यासाठी मुंबई शिक्षक मतदारसंघाचे आमदार आणि शिक्षण क्षेत्रातील ज्येष्ठ अभ्यासक जगन्नाथ मोतीराम अभ्यंकर (जमू अभ्यंकर) यांना उमेदवारी देण्यात आली आहे. शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी ही घोषणा करत त्यांच्या उमेदवारीचा अर्ज आज दाखल केला. उद्या होणा-या निवडणुकीकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. महाविकास आघाडीची संख्या तुलनेने कमी असली तरी लोकशाही प्रक्रियेत सहभाग घेणे महत्त्वाचे असल्याचे दानवे यांनी स्पष्ट केले. आघाडीकडे सध्या केवळ चौदा ते पंधरा सदस्यांचे पाठबळ असल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र, निवडणूक लढवणे ही लोकशाहीची गरज असल्यामुळे उमेदवार उभा केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. अभ्यंकर हे शिक्षण क्षेत्रातील अनुभवी आणि अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने काम केले असून त्यांच्या अनुभवाचा विचार करूनच महाविकास आघाडीने त्यांच्यावर विश्वास दाखवला आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसमधील राजकीय घडामोडींवरही दानवे यांनी भाष्य केले. शरद पवार यांचे नेतृत्व मोठे असून भविष्यातील राजकीय समीकरणांबाबत आत्ताच अंदाज बांधणे योग्य ठरणार नाही, असे ते म्हणाले. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये आघाडीतील पक्ष एकत्र असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### रघूवंशी, पेशन्स ठेवा... आणि गेम बदलला!

सूत्रांच्या माहितीनुसार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चंद्रकांत रघुवंशी यांच्याशी संवाद साधताना केवळ दोन शब्द उच्चारलेरघुवंशी, पेशन्स ठेवा... पेशन्स! शिंदे यांच्या या शब्दांचा मान राखत रघुवंशी यांनी कोणताही आक्षेप न घेता माघार घेतली.

दिवसभर विविध वृत्तवाहिन्यांवर कृपाल तुमाने, चंद्रकांत रघुवंशी आणि मनीषा कायंदे या तिघांच्या नावांची चर्चा सुरू होती. विशेष म्हणजे, उत्तर महाराष्ट्रातील नऊ आमदारांनी चंद्रकांत रघुवंशी यांना उपसभापतीपद देण्याची मागणी करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्रही दिले होते. त्यामुळे कृपाल तुमाने यांच्या तुलनेत रघुवंशी यांचे नाव अधिक आघाडीवर असल्याची चर्चा होती.

मात्र, अखेरच्या क्षणी घडलेल्या राजकीय घडामोडींमुळे उद्धव ठाकरे गटाचे आमदार सचिन अहिर यांनी शिंदे गटात प्रवेश केला आणि त्यानंतर उपसभापतीपदासाठी त्यांचे नाव पुढे आले. त्यांच्याच उमेदवारीवर अखेर शिक्कामोर्तब करण्यात आले.

उपसभापतीपदाची संधी हुकल्यानंतरही चंद्रकांत रघुवंशी यांनी पक्ष नेतृत्वावर विश्वास दाखवत संयमाची भूमिका घेतली. त्यानंतर सर्व संबंधितांच्या उपस्थितीत सचिन अहिर यांनी उपसभापतीपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आणि त्यांचा मार्ग मोकळा झाला.

### टीईटी पेपर फुट प्रकरणी बिजेंद्र गुप्ता मास्टरमाईंड

हे आरोपी पकडले जाऊ नयेत म्हणून वेगवेगळ्या राज्यांत आपली खोटी नावे वापरून वावरत असत.

**पोलिसांची पथके रवाना**

या प्रकरणात पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरमध्ये पाच आरोपींची नावे आहेत. यामध्ये राजीव श्रीप्रयाग शाव, आकाशकुमार स्वराजकुमार, धीरज बलराजसिंह, कपिल दहिया (फरार) आणि बिजेंद्रकुमार गुप्ता यांचा समावेश आहे. सध्या फरार आरोपी कपिल दहिया आणि बिजेंद्र गुप्ता यांच्या अटकेसाठी पोलिसांची पथके तैनात करण्यात आली आहेत. भिवंडी पोलिसांचे पथक सध्या हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहार आणि दिल्लीमध्ये तळ ठोकून असून आरोपींचा शोध घेत आहे.

**आग्रा कनेक्शन, २५ वर्षांची परंपरा**

या तपासात एक अत्यंत महत्त्वाची आणि गोपनीय माहिती पोलिसांच्या हाती लागली आहे. महाराष्ट्रात अशा परीक्षांसाठी लागणाऱ्या प्रश्नपत्रिका छापण्याचे काम गेल्या पंचवीस वर्षांपासून उत्तर प्रदेशातील आग्रा येथील महिम पत्रम प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला दिले जाते. या परीक्षेसाठी चार वेगवेगळ्या प्रश्नपत्रिकांचे संच छापले जातात आणि तिथून थेट ट्रान्सपोर्टद्वारे महाराष्ट्रातील वाशिम, जालना आणि लातूर या केंद्रांवर पाठवले जातात. मात्र, हा पेपर नेमका आग्रा येथील प्रिंटिंग प्रेसधून लीक झाला की ट्रान्सपोर्ट दरम्यान, याचा शोध पोलिस घेत आहेत.

### कार उभी करण्यास विरोध केल्याने

एकाने खिवसरा यांच्यावर चाकूने हल्ला केला. परिणामी, घटनास्थळी धावपळ झाली. यावेळी तेथे उपस्थित असलेल्या नगरसेवक रोहित चांदोडे व ज्यांच्याशी वाद झाला ते राहुल तारगे यांनी हल्लेखोरांना पकडले. जखमी खिवसरा यांना तातडीने खाजगी रुग्णालयात रवाना करण्यात आले. चांदोडे व तारगे यांनी या शसस्त्र तरुणांना पकडण्यात दाखवलेल्या धैर्याबद्दल त्यांचे परिसरात कौतुक होत आहे. पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला आहे. भर दिवसा आणि रहदारीच्या ठिकाणी चाकू हल्ला होण्याच्या या घटनेने पोलिसांपुढे आव्हान उभे केले आहे. हल्ला करणारे तिघे जुनेधुळे परिसरात राहणारे आहेत. पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले आहे. जखमी विशाल खिवसरा यांना खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

### अपघातात मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांच्या

वनसिंग वसावे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. प्रा.डॉ.सतीश देवरे , डॉ.डी.एस.सोनवणे, प्रा.मुकेश वाडेकर डॉ.विलास पंडित, प्रा.विजय खंडारे व विद्यार्थी उपस्थित होते. यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांचे मा.कुलगुरु व विद्यार्थी विकास अधिकारी, कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.जी डी महाजन,सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ.अनंत देशमुख, डॉ डी.व्ही. सोनवणे श्री रविंद्र शिंदे, दिलीप भाऊ मराठे.

### टीईटी प्रकरणी काँग्रेसचे तिसऱ्या दिवशी आंदोलन

शकत नाही. सातत्याने पेपर फुटत असून प्रामाणिक विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होते आहे. मागील महिन्यात नीटचा पेपर फुटल्याने देशभरातून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत असतानाच टीईटीचाही पेपर फुटल्याने सर्वत्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. काँग्रेस पक्षाने पेपरफुटीप्रकरणी आक्रमक भूमिका घेत भाजपा सरकारला सळो की पळो करून सोडले आहे. काल रात्री सागर साळुंखे यांच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेसची विद्यार्थी संघटना ने शिक्षणमंत्री दादा भुसे यांची गाडी अडवून काळे झेंडे दाखवण्यात आले, त्याआधी रविवारी मुंबई युवक काँग्रेस अध्यक्षा झीनत शबरीन यांच्या नेतृत्त्वाखाली शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या सरकारी निवासस्थावर हल्लाबोल केला. आणि आता पुन्हा युवक काँग्रेसने आंदोलन केले आहे. शिक्षणमंत्री दादा भुसे यांचा राजीनामा घेतल्याशिवाय हे आंदोलन थांबणार नाही, असा इशारा युवक काँग्रेसने दिला आहे.

## पान १ वरुन

### शालीनी भदाणेंच्या हस्ते कर्करोग शिबीराचा शुभारंभ

स्तरावरून पाठविण्यात आलेल्या कर्करोग मोबाईल व्हॅन द्वारे कर्करोग आजाराची तपासणी करण्यात आले. बोरकुंड प्राथमिक आरोंग्य केंद्रात आवारात झालेल्या या कर्करोग तपासणी शिबीराचा शुभारंभ माजी जि.प. सदस्या तथा इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानच्या सचिव शालिनीताई बाळासाहेब भदाणे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी जि.प. सदस्य प्रभाकर पाटील, रतनपुरा ग्रा.पं.चे माजी सरपंच दगडू माळी, डॉ. रमेश पाडवी, डॉ. भूषण भदाणे, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ उपस्थित होते.

### सुधीर पाटलांचा पोलीस पाटीलांतर्फे सत्कार

स्वीकारला आहे. सत्कारानंतर झालेल्या संवादात त्यांनी यापूर्वी कार्यरत असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील तसेच खान्देशातील शहादा, नंदुरबार जिल्ह्यातील सेवाकाळातील अनुभव आणि आठवणींना उजाळा दिला. तसेच गावपातळीवर कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावीपणे राखण्यासाठी पोलीस पाटील आणि पोलीस दल यांच्यातील समन्वयाचे महत्त्व अधोरेखित केले. पोलीस पाटील हे गावपातळीवरील पोलिसांचे महत्त्वाचे दुवे असून, वेळेवर माहितीची देवाणघेवाण आणि परस्पर सहकार्यामुळे कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षमपणे राखता येते, असे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी उपस्थितांनी पाटील यांच्या नियुक्तीबद्दल आनंद व्यक्त करत त्यांच्या कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

### शहादे येथे पावसाळ्यापूर्वी नालेसफाई

उपनगराध्यक्षा माधवी मकरंद पाटील यांनी ठिकठिकाणी भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी केली व कामाचा आढावा घेतला. यावेळी त्यांच्यासोबत नगरसेवक सागर मराठे, नगरसेवक तथा भाजप शहराध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी यांच्यासह पालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. लोकप्रतिनिधींनी स्वतः फिरून कामाचा दर्जा तपासल्यामुळे सफाई कामाला मोठी गती मिळाली आहे.

शहरातील प्रमुख नाले, गटारी आणि पाटचाऱ्यांमधील गाळ पूर्णपणे काढल्यामुळे यंदा पावसाळ्यात नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही आणि नवीन वसाहतींमध्ये पाणी शिरणार नाही. शहराच्या स्वच्छतेवर आम्ही अधिक लक्ष केंद्रित केले असून यामध्ये सर्व नगरसेवकांचे मोलाचे सहकार्य मिळत आहे. पालिकेने आपले कर्तव्य चोख बजावले असून, नागरिकांनीही नाल्यांमध्ये कचरा न टाकता प्रशासनाला सहकार्य करावे, हीच अपेक्षा आहे.

-सुनील काशिनाथ पाटील (आरोग्य सभापती, शहादा नगरपालिका)

### मोफत हृदयरोग तपासणी शिबिर

लागतो तसेच अनेक गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होऊन त्यांचे प्राण वाचण्यास मदत होते. एका रक्तदात्याच्या रक्तातून तीन ते चार रुग्णांना जीवनदान मिळू शकते. त्यामुळे प्रत्येक निरोगी नागरिकाने नियमित रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या शिबिरात रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात येणार असून, समाजात रक्तदानाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

धुळे व्यापारी महासंघ व एबी फाऊंडेशन यांच्या वतीने सर्व व्यापारी, सामाजिक संस्था, युवक-युवती तसेच सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करून जीव वाचवूया या अभियानाला यशस्वी करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

नोंदणीसाठी संपर्क : दीपक लुल्ला ८३०८१६३००६, किशोर डीयालानी ९३७३५११०००, खिमजीभाई पटेल ९४२२२३८८६२, प्रशांत देवरे ९८२२६५८००२, अभिजीत सूर्यवंशी ९६२३६३७३१३

### राज्य कर्जात बुडताना कंत्राटदार आत्महत्या करताहेत

मागण्यांमध्ये यासाठी आवश्यक तरतूद दिसत नाही. केंद्र सरकारकडून २०२४ नंतर अपेक्षित आर्थिक मदत मिळण्याची शक्यता कमी असताना राज्य सरकारने स्वत:ची जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी अंबादास दानवे यांनी केली.

विदर्भ आणि मराठवाड्याचा सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी सुमारे २ लाख ८५ हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. वैनगंगा-नळगंगा, पैनगंगा -दमनगंगा-वैतरणा-गोदावरी यांसारख्या महत्त्वाच्या नदीजोड प्रकल्पांची केवळ घोषणा झाली असून अनेक ठिकाणी सर्वेक्षणही पूर्ण झालेले नाही. मराठवाड्याच्या विकासासाठी जाहीर केलेल्या प्रकल्पांना अत्यल्प निधी मिळत नसल्याने हा प्रदेश पुन्हा विकासापासून वंचित राहत असल्याचे दानवे यांनी नमूद केले.

जिंतूर-मानवत-दुधना प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील उर्वरित गावांच्या मोजणीसाठी अवघ्या १७ लाख रुपयांचा निधी नसल्यामुळे सुमारे ८० दशलक्ष घनमीटर पाण्याचा उपयोग होत नाही. तसेच वैजापूर-गंगापूर वॉटर ग्रीड योजनेचे ८८७ कोटी रुपयांचे काम निधीअभावी रखडले असून त्याचा फटका शेकडो गावांना बसत आहे. जलसंपदा विभागातील रखडलेल्या कामांचा उल्लेख करत दानवे यांनी अनेक धरणे आणि सिंचन प्रकल्प दुरुस्तीअभावी धोक्यात असल्याचे सांगितले.

## महापौर मायादेवी परदेशींच्या हस्ते कृष्ण नगर आ.केंद्रात पोलिओ डोस दिला

धुळे, दि.३० - धुळे महानगरपालिका चे कृष्ण नगर नागरी येथील आरोग्य केंद्रात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ झाला. कृष्ण नगर नागरी आरोग्य केंद्राच्या वतीने राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमे चे आयोजन करण्यात आले. या मोहिमेचे उद्घाटन महापौर मायादेवी परदेशी यांच्या शुभहस्ते लाभार्थ्यांना पोलिओ डोस देऊन करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना महापौर मायादेवी परदेशी म्हणाल्या की, पल्स पोलिओ मोहीम ही देशातील प्रत्येक बालकाला पोलिओमुक्त ठेवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. आपल्या कृष्ण नगर भागातील सर्व बालकांना लस देऊन त्यांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी आरोग्य विभागाने केलेले नियोजन प्रशंसनीय आहे. या महत्त्वाच्या कार्यक्रमास आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ आणि लोकप्रतिनिधींची विशेष उपस्थिती होती. यावेळी आरोग्य अधिकारी डॉ. संपदा कुलकर्णी, डॉ. महेश अहिरराव, डॉ. मनीषा महाजन, डॉ. अर्चना पाटील, कॅम्पच्या हर्षाली चौधरी आणि स्थानिक नगरसेविका प्रतिभा चौधरी प्रामुख्याने उपस्थित होत्या. या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कृष्ण नगर नागरी आरोग्य केंद्रातील सर्व वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी मोलाचे योगदान दिले. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करून आरोग्य विभागाच्या सर्व टीमचे अभिनंदन केले.

## पान १ वरुन

### अठरा कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट

ठरावाद्वारे वृक्षलागवडीचा आराखडा तयार करावा आणि तो केंद्र सरकारच्या पोर्टलवर अपलोड करावा. हे काम वेळेत पूर्ण झाल्यास वृक्षलागवडीच्या खर्चापैकी काही निधी केंद्र शासनाकडून उपलब्ध होऊ शकतो.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी आणि वन अधिकारी यांनी समन्वयाने प्रत्येक गावाचा आराखडा तयार करून उद्दिष्टे निश्चित करावीत. प्रत्येक ग्रामपंचायतीने उपलब्ध जमिनीचा योग्य वापर करून नियोजनबद्ध वृक्षलागवड करावी, यासाठी जनजागृती मोहीमही राबविण्यात यावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील लागवडीसाठी आवश्यक जमीन ओळखून जीआयएस आधारित लँड बँक तयार करण्यात आली असून ती जिल्हाधिकारी आणि संबंधित विभागांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. विभागनिहाय उद्दिष्टांचे नियमित पुनरावलोकन करावे. विभागीय आयुक्तांनी जिल्हानिहाय आढावा घेऊन नियमित अहवाल शासनाला सादर करावा, अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

पुढील वृक्षलागवड हंगामापूर्वी रोपांची पुरेशी उपलब्धता राहावी यासाठी खासगी संस्था, स्वयंसेवी संस्था आणि इतर भागीदारांच्या सहकार्याने नियोजन करण्यावर भर देण्यात यावा. कृषी विद्यापीठे आणि इतर संस्थांकडे उपलब्ध मोठ्या प्रमाणातील जमिनींचाही वृक्षलागवडीसाठी उपयोग करण्यात यावा. यामुळे शासन आणि खासगी क्षेत्राच्या संयुक्त प्रयत्नातून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड शक्य होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

वृक्ष लागवडीसाठी खासगी संस्थांचा सहभाग असलेल्या खासगी-सार्वजनिक भागीदारीचा (पीपीपी) आराखडा तयार करण्यात आला असून या आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी एकात्मिक कार्यपद्धती विकसित करण्यात आली आहे. ही कार्यपद्धती महापालिकांनाही देण्यात यावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

वृक्ष लागवडीचे रिअल-टाईम मॉनिटरिंग करण्यासाठी उपग्रह तंत्रज्ञान, ड्रोनचा वापर आणि जीआयएस प्रणालीचा वापर करण्याची माहिती देण्यात आली. लागवड केलेल्या रोपांची वाढ आणि स्थिती सहा महिन्यांपर्यंत अचूकपणे तपासता येईल, अशी व्यवस्था विकसित करण्यात आली आहे. यासाठी महाराष्ट्र रिमोट सेंन्सर प्लिकेशन सेंटरच्या माध्यमातून आवश्यक यंत्रणा उभारण्यात आली असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी रोपांच्या उपलब्धतेचाही आढावा घेण्यात आला. सध्या वन विभागाकडे सुमारे सहा कोटी रोपे उपलब्ध असून पुढील वर्षापर्यंत ही क्षमता दहा कोटी रोपांपर्यंत वाढविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी खासगी रोपवाटिकांचा पीपीपी तत्त्वावर सहभाग वाढविण्यात येणार आहे. रोपांचे उत्पादन, विक्री आणि वितरणात खासगी गुंतवणूक वाढेल, तर वन विभाग मूळ नियोजन आणि गुणवत्ता नियंत्रणाची जबाबदारी पार पाडेल, असे यावेळी वन विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

कृषी विभागाच्या वतीनेही रोपांची निर्मिती करण्यात येत असून कृषी विद्यापीठाकडील रोप वाटिकेमधून सुमारे १५ लाख रोपांची निर्मिती करण्यात येत आहे. तसेच खासगी मान्यता प्राप्त रोपवाटिकेमधून २ कोटी ६६ लाख रोपांची निर्मिती करण्यात येत असल्याची माहिती कृषी विभागाच्या वतीने देण्यात आली.

### होळच्या वारकरी दिंडीचे भव्य स्वागत

यावेळी मबेटी बचाव, बेटी पढावफअभियानाच्या प्रदेश उपाध्यक्ष सौ. अल्पा अनुप अग्रवाल यांच्या हस्ते वारकऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यांनी वारकऱ्यांना औषध किटचेही वितरण केले. कार्यक्रमास कान्हादेश वारकरी सेवा मंडळाचे सुधाकर बापू भोकरे, सचिव सुनीलभाऊ वाघ, विश्वस्त प्रकाश विभांडिक, कैलास पवार, आर. जी. पाटील, धनराज माळी, विनोद पवार (अमळथे), पी. एन. खैरनार, जिल्हाध्यक्ष शोभा जगताप, सुनील शिंदे, किरण भारती, यशवंत पाटील, कुमार मराठे, देविदास मराठे, बबलू पाटील, दगडू नाना, भद्रे महाराज, कांतीलाल सोनार, रवींद्र धनगर, राजू पाटील, योगीराज पाटील, सुरेश पाटील, ए.बी. फाउंडेशनचे कमलेश देवरे यांच्यासह धुळे जिल्ह्यातील वारकरी संप्रदायाचे अनेक पदाधिकारी व भाविक उपस्थित होते.

या सेवा उपक्रमाबद्दल वारकऱ्यांनी आयोजकांचे आभार मानले. पंढरपूरच्या वारीसाठी निघालेल्या वारकऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

### द्वारकाधीश संस्थानच्या दिंडीचे गणपुले मंदिरात स्वागत

धुळे, दि.३०- महाराष्ट्राला लाभलेल्या संतपरंपरे नुसार विठूरायांचे लाखो वारकरी आषाढी एकादशीच्या निमित्ताने राज्याच्या विविध भागातून दिंड्या व पालखीच्या माध्यमातून पायी पंढरी कडे कूच करत असतात यात धुळे जिल्हा देखील मागे नाही. विखरण येथील श्री द्वारकाधीश संस्थान ची दिडशे हून अधिक वर्षांची प्राचीन परंपरा लाभलेली अशोक महाराज टिल्लू यांच्या नेतृत्वाखाली पंढरपूर ला जाणाऱ्या दिंडीचे प्रथेप्रमाणे खोलगल्लीत प्राचीन श्री गणपुले दत्त मंदिर संस्थानात विधिवत स्वागत करण्यात आले.

श्री अशोक महाराज यांचे गणपुले दत्त मंदिर संस्थान विश्वस्त मंडळा तर्फे शाल श्रीफळ पुष्पहार देऊन स्वागत करण्यात आले. या प्रसंगी दिंडीतील वारकऱ्यांनी टाळ मृदुंगा च्या साथीने मंदिरात हरिपाठ व दत्त गुरूंची गीते भजने सादर केली व सायं आरतीत सहभाग घेतला. या निमित्ताने वारकऱ्यांच्या मोठ्या संख्येने उपस्थिती मुळे मंदिर परिसरातील वातावरण भक्तीमय व भारावलेले झाल्याचे अनुभवण्यात आले. मंदिर विश्वस्त मंडळा तर्फे वारकऱ्यांना प्रसाद अल्पोपाहार देण्यात आला. श्री गणपुले दत्त मंदिर संस्थान च्या अध्यक्ष धनश्री गरुड, सचिव आनंद कुलकर्णी, उपाध्यक्ष अनुप बनछोड, सहसचिव अभय शेंद्रे, जेष्ठ विश्वस्त शरदचंद्र देशपांडे व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विश्वस्त मंडळा तर्फे वारकऱ्यांना पंढरपूर वारी पायी प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या व त्यानंतर दिंडी मुक्कामासाठी खोलगल्लीतील दुर्गादेवी मंदीराकडे मार्गस्थ झाली.


## निधन वार्ता

### श्यामकांत पोतदार आज अंत्ययात्रा



धुळे, दि.३०- सुवर्णकार समाजातील ज्येष्ठ कार्यकर्ते तसेच जुने धुळ्यातील रहिवासी असलेले श्यामकांत ढोलनशेठ पोतदार यांचे निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते.त्यांची अंत्ययात्रा १ जुलै रोजी सकाळी ९-०० वा.जुने धुळ्यातील दुर्गा माता मंदिराजवळून एकविरा देवी मंदिराजवळील अमरधाम येथे नेण्यात येईल. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, जावई, मुलगी आणि नातवंडे असा परिवार आहे. चंद्रकांत, लक्ष्मीकांत आणि गणेश पोतदार यांचे ते वडील होत.

### हिरकनबाई पाटील



धुळे, दि.३०- देवपूरातील दोंदे कॉलनीतील रहिवासी हिरकनबाई भिमराव पाटील यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८६ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावाई, नातवंडे असा परिवार आहे. त्या एकविरा हायस्कूलचे निवृत्त शिक्षक पंडीत पाटील, सदाशिव पाटील यांच्या मातोश्री होत.

**पाहिजेत**

रेडिमेड दुकान कामासाठी काम करणारी हुशार मुले पाहिजेत. त्वरीत भेटा आकर्षक पगार

**श्रीसत्यनारायण** ग.नं.२, जैन मंदीराजवळ, धुळे फो. 236485

**पाहिजे**

दै. आपला महाराष्ट्रच्या नवीन आवृत्तीसाठी संपादकीय विभागाचे ज्ञान व दैनिकाचे स्वत: पाने लावू शकणारा होतकरु उपसंपादक लावणे आहे.

-: संपर्क :-

9422286496

**पाहिजेत**

लोकमान्य नागरी सहकारी पतसंस्था मर्या.धुळे मध्ये एक शिपाई लावणे आहे. (शिपाईसाठी शिक्षण-कमीत कमी १२वी पास). अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल तरी इच्छुकांनी दुपारी ४ ते ६ या वेळेत संपर्क साधावा.

-: संपर्क :-

लोकमान्य नागरी सहकारी पतसंस्था मर्या.धुळे F-1,सहरीया अपार्टमेंट ग.नं.२, पाला बाजार, बारापत्थर, धुळे फोन नं.(०२५६२)२२९३७७

**पाहिजेत**

रेडीमेड कापड दुकानासाठी हुशार व अनुभवी सेल्समन/ हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार व इतर सवलती दिल्या जातील.

**अपोलो गारमेन्ट** गरुड मैदान कॉम्प्लेक्स, साक्रीरोड, धुळे

7498748799

**भाड्याने देणे आहे**

नवतेज बाजार समोर कालीका प्रोव्हीजन जवळ देवपूर तीन रुमचे स्वतंत्र घर कंपनीस, ऑफिस, फॅमेलीस भाड्याने देणे आहे.

- संपर्क -

8055404946
8421461410

**प्रवेश सुरु २०२६-२७**

क.ब.चौ.उ.म.वि.जळगाव यांच्या संलग्नतेने सत्कार्योत्तेजक सभेचे भारतीय विद्या संशोधन केंद्र, रामवाडी धुळे येथे खालील अभ्यासक्रमाचे प्रवेश देणे सुरु आहे.

१. **पी.जी.डिप्लोमा इन गायडन्स ॲण्ड कौन्सीलींग** - १ वर्ष
२. **ज्येष्ठांचे मानसशास्त्र व समुपदेशन** - ६ महिने
३. **संस्कृत भाषा परिचय आणि संभाषण कौशल्य** - ६ महिने
४. Certificate Course in Communicative English - ३ महिने
५. **प्रमाणपत्र अभ्यासक्रम- मोडीलिपी** - ३ महिने

अखिल भारतीय कीर्तन संस्था दादर यांच्या

१. **कीर्तनालंकार पदवी अभ्यासक्रम** - साडेतीन वर्ष

जागा मर्यादित आहे. आपला प्रवेश आजच निश्चित करा.

संपर्क :- डॉ.एन.एम.जोशी

9421500882, 9146768700, 9623143714

**भाड्याने देणे आहे**

१४०० स्केफुट तळमजला ३३०० स्केफुट पहिला मजला सुनिल मेडीकल स्टोअर्स ८० फुटी रोड येथील हॉल भाड्याने देणे आहे.

- संपर्क -

9922754000

**भाड्याने देणे आहे**

डोंगरे महाराज नगर कानुश्री पहिला मजला, Solar सहीत, २४ तास पाणी, भाडण्याने देणे आहे.

: संपर्क :

9822545666

**WANTED**

Clever & Experience Holder Pharmacist

Pay 13000/-

9823833108




हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०